(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

पृ. शी. : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबईतील इंदू मिलच्या जागेत आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभे करण्यासाठी करावयाची उपाययोजना

मु. शी. : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबईतील इंदू मिलच्या जागेत आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभे करण्यासाठी करावयाची उपाययोजना या विषयावर सर्वश्री सुभाष चव्हाण, हेमंत टकले, संजय दत्त, भाई जगताप, प्रकाश बिनसाळे, रमेश शेंडगे, श्रीमती अलका देसाई, श्री. किरण पावसकर, ॲड. जयदेव गायकवाड, प्रा. सुरेश नवले, सर्वश्री नरेंद्र पाटील, राम पंडागळे, वि.प.स. यांचा प्रस्ताव

उप सभापती : आता नियम 260 अन्वये असलेला प्रस्ताव चर्चेला घेण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चेला कोणते माननीय मंत्री महोदय उत्तर देणार आहेत ?

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित आहेत.

श्री. जयंत प्र. पाटील : ज्या खात्याच्या संबंधातील प्रस्तावावर चर्चा सुरु होत आहे त्या खात्याचे मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, आपण प्रस्तावावरील चर्चा सुरु करावी. या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देण्यासाठी मी उपस्थित आहे परंतु तोपर्यंत संबंधित खात्याचे मंत्री सुध्दा सभागृहात उपस्थित होतील. ते सभागृहात येत असल्याचे त्यांनी मला कळविले आहे.

उप सभापती : ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, भारतरत्न, घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना वंदन करुन मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

" देशाच्या आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहरात महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक व्हावे, त्यासाठी केंद्र शासनाच्या अखत्यारित असलेली इंदू मिलची जागा या ऐतिहासिक अशा भव्य स्मारकास मिळावी या राज्य विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी एकमताने केलेल्या ठरावाची आणि राज्यातील जनतेची भावना लक्षात घेऊन माननीय मुख्यमंत्री यांनी देशाचे पंतप्रधान आणि वस्त्रोद्योग मंत्री, भारत सरकार यांचेकडे पाठपुरावा केल्यानंतर ही मागणी केंद्र शासनाने मान्य करणे, एनटीसीच्या जागेवर असलेली इंदू मिलची जागा राज्य शासनाने स्मारकांसाठी अधिग्रहण करुन त्यावर आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभे करण्यासाठी प्राधिकरणाची स्थापना व निधीची तरतूद करुन हे स्मारक लवकरात लवकर पूर्ण करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी. "

सभापती महोदय, देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहरात महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या क्रांतिसूर्याच्या अतिशय उत्कृष्ट आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकासाठी इंदू मिलची साडेबारा एकर जमीन देण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला. हा क्रांतिकारी, ऐतिहासिक निर्णय लोकसभेत वस्त्रोद्योग मंत्री सन्माननीय श्री. आनंद शर्मा आणि राज्यसभेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणारे केंद्रीय संसदीय कार्य राज्यमंत्री श्री. राजीव शुक्ला यांनी जाहीर केला. संपूर्ण देशातील आणि महाराष्ट्रातील आंबेडकरी जनता व देशातील सर्व जनता या निर्णयामुळे अत्यंत आनंदमय झालेली आहे. या प्रक्रियेसाठी, ऐतिहासिक निर्णयासाठी ज्यांनी ज्यांनी प्रयत्न केले, ज्यांनी ज्यांनी पाठपुरावा केला त्यांचा मी आमच्या काँग्रेस पक्षाच्या वतीने शतश: आभारी आहे. त्यात आमच्या राज्याचे क्रांतिकारी मुख्यमंत्री सन्माननीय श्री. पृथ्वीराज चव्हाण, माननीय पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग, आमच्या सर्वेसर्वा श्रीमती सोनियाजी गांधी, केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री श्री. आनंद शर्मा, आमच्या पक्षाचे प्रांताध्यक्ष श्री. माणिकराव ठाकरे, लोकसभेतील सभागृहाचे नेते व केंद्रीय गृहमंत्री माननीय श्री.सुशीलकुमारजी शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष व केंद्रीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. सुभाष चव्हाण .....

कृषी मंत्री माननीय श्री. शरद्चंद्रजी पवार, ज्यांच्या काळात ही प्रक्रिया सुरु होती ते दिवंगत केंद्रीय मंत्री व राज्याचे माजी मुख्यमंत्री श्री. विलासरावजी देशमुख, केंद्रीय मंत्री श्री. मुकुल वासनिक, डॉ. भालचंद्र मुणगेकर, खासदार श्री. एकनाथराव गायकवाड, अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस श्री. विलास मुत्तेमवार, लोकसभा व राज्यसभेतील महाराष्ट्राचे सर्व आम खासदार,

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण...

महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील सर्व सदस्य तसेच महाराष्ट्र विधिमंडळ अनुसूचित जाती फोरम या सर्वांचा मी शतश: आभारी आहे.

या ऐतिहासिक प्रक्रियेला 2004 पासून सुरुवात झाली. 2004मध्ये केन्द्रामध्ये नवीन सरकार आले. त्या केन्द्रीय मंत्रिमंडळामध्ये एकाच वेळी महाराष्ट्राच्या तीन माजी मुख्यमंत्र्यांचा समावेश करण्यात आला. त्यामध्ये एक श्री. शरदचंद्रजी पवार दुसरे स्व.विलासराव देशमुख आणि तिसरे श्री. सुशिलकुमार शिंदे हे होते. तसेच श्री. मुकूल वासनिक हे देखील त्या मंत्रिमंडळामध्ये होते. या ऐतिहासिक प्रक्रियेमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. या तिन्ही माजी मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्रात न्यायाने राज्य चालविले. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेली सामाजिक समता त्यांनी राज्यात निर्माण केली. हे महाराष्ट्राचे तिन्ही माजी मुख्यमंत्री केन्द्राच्या मंत्रिमंडळामध्ये एकाच वेळी मंत्री झाले हा एक चांगला योग आहे. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वात मूलभूत असे हक्क भारतातील जनतेला प्राप्त करुन दिलेले आहेत. राज्यकारभारात, प्रशासनात, समाजकारणात आणि न्याय देवतेच्या मंदिरात एक वेगळया प्रकारचे अधिष्ठान मिळवून देणारी सर्वतत्वे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या राज्यघटनेत समाविष्ट केलेली आहेत. देशातील सर्व समाजव्यवस्था भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या राज्यघटनेमुळे एका क्षणात समान पातळीवर आणली गेली आहे. जगातील सर्व देशातील राज्यव्यवस्थेमध्ये भारतातील लोकशाही राज्यव्यवस्था ही आज यशस्वी ठरलेली आहे. भारतीय राज्यघटना तयार करण्याचे ऐतिहासिक आणि महत्वपूर्ण काम भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले आहे. जगाच्या पाठीवर एक सक्षम अशा प्रकारची राज्यघटना त्यांनी लिहिल्यामुळेच मी आज या सर्वोच्च सभागृहामध्ये भाषण करु शकत आहे.

सभापती महोदय, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म या महाराष्ट्रात झाला नसता तर त्यांनी घटना लिहिली नसती आणि या महाराष्ट्राचा मुख्यमंत्री कदापि अनुसूचित जातीचा झाला नसता. सन्माननीय सोनिया गांधी यांनी श्री. सुशीलकुमार शिंदे यांना लोकसभेचे नेते आणि देशाचे गृहमंत्री केलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या राज्यघटनेमुळे या सर्व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण...

गोष्टी प्राप्त झालेल्या आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांमुळे आज आम्ही सर्व उभे आहोत. या भारतवर्षात लोकशाही प्रगल्भ होण्यासाठी देशाला घटना देणा-या या महामानवाचे फ्रान्स, अमेरिका,जर्मनी, इंग्लड, चीन या सर्व देशातील स्मारकापेक्षा भव्य असे स्मारक महाराष्ट्रात आणि तेही देशाची आर्थिक राजधानी असलेल्या या मुंबईमध्ये उभारण्याचा मान आपल्या राज्याला मिळालेला असल्यामुळे आपण मोठे भाग्यवान ठरलो आहोत. देशाची राजधानी दिल्ली येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरु यांची असलेली समाधीस्थळे ही सर्वांची श्रद्धास्थाने बनलेली आहेत. अमेरिकेची ओळख अलेला जगविख्यात स्टॅच्यू ऑफ लिबर्टी हे जगातील सातवे आश्चर्य आहे. जगात एकूण सात आश्चर्ये आहेत. त्यामध्ये चीनची भिंत, इटलीतील झुलता मनोरा, फ्रान्सचा प्रट्रोनास टावर, इजिप्तचे पिरॅमिडस इत्यादी आश्चर्ये आहेत आणि सातवे आश्चर्य आग्रा येथील ताजमहाल हे आहे. शहाजानने आपल्या पत्नीच्या प्रेमापोटी हा ताजमहाल बांधून सातवे आश्यर्च निर्माण केलेले आहे. त्यानंतर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाचे आठवे आश्चर्य आम्ही महाराष्ट्रामध्ये निर्माण करीत आहोत. जगातील कोणतीही व्यक्ती जेव्हा भारत देशात येईल त्यावेळी ती प्रथम जगातील आठवे आश्चर्य बघण्यासाठी मुंबईमध्ये येईल.

अमेरिकेतील स्टॅच्यू ऑफ लिबर्टी 360 फूट आहे. त्याही पेक्षा उंचीचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक होणार आहे. समतेचा संदेश देणा-या लोटसचे डिझाइन असलेले कन्हेन्शन सेंटर उभारण्यात येणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चेह-यावर जसे सूर्याप्रमाणे तेज होते त्याप्रमाणे स्मारकाचा घुमट दिवसा सूर्याप्रमाणे तेजस्वी आणि रात्री तांबड्या दिव्यांमुळे सोन्याप्रमाणे लखलखीत दिसेल. एकाच वेळी 4 हजार लोक जेवतील असे भव्य फूडकोर्ट तेथे उभारण्यात येणार आहे. साडेपाच हजार चौ.फू. जागेमध्ये भव्य ग्रंथालय उभारण्यात येणार आहे. त्या ग्रंथालयामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली आणि आंबेडकरवादी साहित्यिकांनी लिहिलेली जवळ जवळ 10 हजार पुस्तके या ग्रंभालयामध्ये असणार आहेत. अशा प्रकारचे भव्य स्मारक अपेक्षित आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण....

महोदय,डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे जगातील सर्वात मोठे कायदेतज्ज्ञ होते. जगातील सर्वात मोठे अर्थतज्ज्ञ होते, समाजशास्त्रज्ज्ञ होते, मानव वंशज शास्त्रज्ज्ञ होते. सव्यसाची पत्रकार होते, उत्कृष्ट संसदपटू होते. जगातील सर्व भाषा त्यांना अवगत होत्या. जागतिक विचारवंत म्हणून ती पहिली व्यक्ती होती. कोंलबिया विद्यापीठातून 200 विद्वान म्हणून निवडण्यात आले होते, त्यात जगातून पहिला सर्वोकृष्ट विद्यार्थी म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची निवड झाली होती. डॉक्टर ऑफ सायन्स,पी.एच.डी., इकॉनॉमी युनिव्हर्सिटी ऑफ लंडन ही पदवी त्यांनी प्रदान केली होती. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक व्हावे यासाठी इंदू मिलची जागा उपलब्ध करुन देण्याबाबत या राज्याचे माननीय मुख्यमंत्री, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी अथक प्रयत्न केले. आम्ही या अनुषंगाने जी माहिती मिळविली, त्यात असे दिसून आले की, या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांचा सिंहाचा वाटा आहे. माननीय मुख्यमंत्र्यांचे मन मोठे आहे, त्यांची उंची मोठी आहे. त्यांची दिल्लीमध्ये अतिशय चांगली पत आहे. ज्यावेळी यासंबंधीचा निर्णय घेतला गेला, त्यावेळी माननीय मुख्यमंत्री महोदय म्हणाले की, हे श्रेय माझे एकटयाचे नसून ते सर्वांचे आहे.यासाठी आपण सगळयांनी प्रयत्न केलेले आहेत.

सभापती महोदय, मागील काही दिवसात औचित्यपूर्ण झालेल्या अस्मितेच्या प्रश्नाला यशस्वी करताना माननीय मुख्यमंत्र्यांना कसा कसा प्रयत्न करावा लागला या बाबतचा मी थोडक्यात आराखडा सांगू इच्छितो. माननीय मुख्यमंत्र्यांमध्ये परिपक्वता आहे. दिल्लीतील त्यांची पत, राजधानीतील प्रश्न सोडविण्याचा त्यांचा अनुभव ठळकपणे अधोरेखित झाला आहे हे या कामावरुन निश्चितपणे दिसून आले आहे. गेल्या 31 डिसेंबरला राज्याचे माननीय मुख्यमंत्री सर्व पक्षीय नेते, सर्व पक्षांचे प्रांताध्यक्ष आणि आंबेडकर चळवळीतील अग्रगणी यांचे एक शिष्टमंडळ तयार करुन माननीय पंतप्रधानांना भेटले. इंदू मिलच्या जागेवर होणाऱ्या स्मारकाचा प्रश्न सर्व पक्षीय सहभागातून थेट राजधानीत पोहोचला. माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी सदरहू मागणीचे गांभीर्य हेरले आणि याबाबत त्यांनी तत्काळ मान्यता दिली. हीच खरी लढाई माननीय मुख्यमंत्र्यांची होती. माननीय मुख्यमंत्र्यांची देशात असलेली पत यावरुन स्पष्टपणे दिसून येते. मी मघाशी म्हणालो की, याबाबतचे सर्व श्रेय माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वत:कडे घेतलेले नाही. ते श्रेय सगळया समाज बांधवांना दिले आहे. सगळया पक्षीय नेत्यांना दिले आहे. या प्रक्रियेत माननीय मुख्यमंत्र्यांचा सिंहाचा वाटा आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण...

सभापती महोदय, दिनांक 6 डिसेंबर या महानिर्वाण दिना पूर्वी याबाबतची घोषणा व्हावी असे माननीय मुख्यमंत्र्यांना मनापासून वाटत होते. माननीय मुख्यमंत्री 2 डिसेंबर रोजी दिल्ली येथे गेले. ते 5 डिसेंबर पर्यंत दिल्ली येथे ठाण मांडून बसले. त्यांचा संपूर्ण ताफा उद्योग भवनाच्या खोली क्रमांक 45 मध्ये चार-चार, पाच-पाच तास बसत होता. 5 डिसेंबर, 2012 रोजी या ऐतिहासिक निर्णयावर माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण आणि वस्त्रोद्योग मंत्री श्री.आनंद शर्मा या दोघांनी चर्चेअंती शिक्कामोर्तब केले. यासंबंधीच्या बैठका दीर्घकाळ चालत होत्या. या संदर्भात वारंवार बैठका सुरु होत्या परंतु निर्णय होत नव्हता. 1974 च्या सुमारास राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळास इंदू मिलची जागा मिळाली. ही जागा पूर्वी खाजगी कंपनीची होती. 1974 मध्ये ही जागा वस्त्रोद्योग महामंडळाच्या ताब्यात आली. सदर जागा हस्तांतरण करण्यासंदर्भात अनंत अडचणी होत्या. ही बाब ताबडतोब माननीय मुख्यमंत्र्यांना समजली. जागा हस्तांतरणाच्या कामात थोडी तांत्रिक अडचण आहे, काम कठीण आहे. परंतु माझ्या आंबेडकरी जनतेला सामोरे जावयाचे आहे. त्यामुळे वस्त्रोद्योग सचिवांच्या सहभागात माननीय मुख्यमंत्र्यांनी उच्चस्तरीय समिती स्थापन केली. त्या समितीमध्ये श्री.रत्नाकर गायकवाड,माजी मुख्य सचिव यांचाही समावेश होता. तेही आपले होते, त्यांचाही लाभ आपल्याला मिळाला. या समितीच्या अनेक बैठका झाल्या. त्यात काही बैठका वादळी झाल्या. बऱ्याचशा बैठका निगेटिव्ह झाल्या, नंतर त्यातून पॉझिटिव्ह मार्ग निघाला. माननीय मुख्यमंत्र्यांचा सततचा पाठपुरावा होताच. हा प्रश्न अतिशय भावनिक असल्याने काही बैठका अतिशय वादळी ठरल्या. त्या बैठकांमध्ये कोणत्याही प्रकारचा निर्णय झाला नाही. सभापती महोदय, त्यानंतर 2 डिसेंबर, 2012 रोजी माननीय मुख्यमंत्री दिल्ली येथे गेले. त्यांचा फक्त इंदू मिलची जागा एवढाच अजेंडा होता. माननीय मंत्र्यांचा शपथविधी, महामंडळांच्या अध्यक्षांच्या नियुक्त्या असे कोणतेही प्रश्न माननीय मुख्यमंत्री दिल्ली येथे घेऊन गेले नव्हते....

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री.सुभाष चव्हाण.....

फक्त इंदू मिलच्या जागेचा विचार होता. तांत्रिक बाबी पूर्ण व्हावयास वेळ लागणार याची माननीय मुख्यमंत्र्यांना कल्पना होती. 6 डिसेंबरला आंबेडकरी जनतेला मी काय उत्तर द्यायचे हा प्रश्न त्यांच्यासमोर होता. 3 डिसेंबरला माननीय मुख्यमंत्री यांनी केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्र्यांची दिल्ली येथे दोन तास भेट घेतली. त्यातून काही निष्पन्न झाले नाही. दुसऱ्या दिवशी महाराष्ट्राचे केंद्रातील सर्व मंत्री, सर्व खासदार यांनी एकत्रितपणे केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्र्यांची भेट घेतली. सर्व खासदारांनी केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्र्यांना राज्यातील आंबेडकरी जनतेच्या आग्रही मागणीची जाणीव करुन दिली.

सभापती महोदय, संसदेमध्ये एफ.डी.आय.च्या प्रश्नावरुन वातावरण तप्त झालेले होते. पंतप्रधान कार्यालयाशी माननीय मुख्यमंत्र्यांची जवळीक होती. या जागेच्या निर्णयासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय पंतप्रधानांची भेट घेणे आवश्यक होते. अशा तप्त वातावरणात ती भेट होणे कठीण झाले होते. माननीय मुख्यमंत्र्यांचा दिल्लीतील वास्तव्याचा हा तिसरा दिवस होता. यश प्राप्त झाल्याशिवाय राज्यात परतायचे नाही हा त्यांचा ध्यास होता. शेवटी सर्व खासदार, महाराष्ट्रातील सर्व केंद्रीय मंत्री आणि महाराष्ट्रातील नेत्यांनी नेटाचे प्रयत्न केले. माननीय मुख्यमंत्र्यांना माननीय पंतप्रधानांनी संसद भवनातील कार्यालयात भेट दिली. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली व्यक्त करण्यासाठी त्यांचे स्मारक उभारावे म्हणून मुंबईच्या इंदू मिलची 12.5 एकर जागा देण्याची 5 डिसेंबरला दुपारी 12.00 वाजता संसदेच्या दोन्ही सभागृहात ऐतिहासिक घोषणा केली गेली.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवाचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक व्हावे यासाठी महाराष्ट्र शासन व केंद्र शासनाने निधीची तरतूद केली पाहिजे. केंद्र शासनाने हे स्मारक उभारण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे, अशी शिफारस महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारला करावी. इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्यदिव्य स्मारक उभे रहावे म्हणून राज्य शासनाने प्राधिकरण स्थापन करावे व त्यासाठी निधीची तरतूद करावी. या प्राधिकरणाचे अध्यक्षपद माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वत: भूषवावे एवढे बोलून व एक कविता वाचून मी माझे भाषण पूर्ण करतो.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण.....

जरी संकटाची काळरात्र होती
तरी भीमराया तुझी साथ होती
जिंदगीच माझी सलामात होती
गणतीच माझी गुलामात होती
तोडलीस माझी गुलामाची बेडी
अशी झुंझणारी तुझी जात होती.

जय हिंद, जय महाराष्ट्र, जय भीम.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय गिरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, हा प्रस्ताव काय आहे हे माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांच्या भाषणातून कळले नाही. त्यांचे भाषण म्हणजे माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करणारा प्रस्ताव होता असे मला वाटले. स्मारकाचा निर्णय यापूर्वीच झालेला आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. प्रस्तावाचा मसुदा काय आहे हे आजच्या कामकाजपत्रिकेत नमूद केलेले आहे. माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी प्रस्तावावरील आपल्या प्रास्ताविक भाषणामधून माननीय मुख्यमंत्र्यांचे कौतुक केले तर त्याबाबत असूया वाटण्याचे काही कारण नाही. माननीय सदस्य श्री.विजय गिरकर हे ज्येष्ठ सदस्य आहेत. माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांच्या भाषणातून प्रस्ताव काय आहे हे समजले नाही असे त्यांचे म्हणणे ऐकून मला आश्चर्य वाटले. चळवळीतील कार्यकर्त्यांना हे कळू नये याचे आश्चर्य वाटले. याबद्दल माझी हरकत आहे. प्रस्ताव काय आहे हे कळले नाही असे माननीय सदस्यांनी बोलू नये. आजच्या कामकाजपत्रिकेतील प्रस्तावाच्या मसुद्यामध्ये आशय नमूद केला आहे.

नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : माझी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आज सभागृहासमोर ऐतिहासिक प्रस्ताव चर्चेसाठी आलेला असल्यामुळे या प्रस्तावावर चर्चा करीत असतांना कुणीही कुणाच्या भाषणावर आक्षेप घेऊ नये. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संदर्भातील आपल्या भावना नम्रपणे व्यक्त कराव्यात अशी मी आपल्याला विनंती करतो. सन्माननीय सदस्य श्री. भाई गिरकर यांनी आपल्या भाषणाला सुरुवात करावी अशी विनंती करतो.

श्री. विजय गिरकर : सभापती महोदय, इंदू मिलच्या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक तयार करण्याचा आराखडा अद्याप तयार झालेला नाही, यासंदर्भात समितीही स्थापन व्हावयाची आहे. डॉ.बाबासाहेबांच्या स्मारकासाठी इंदू मिलची 12.5 एकर जागा मिळाल्याबद्दल मी अभिनंदन करतो. सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी बाबासाहेबांचे स्मारक सूर्य, कमळाप्रमाणे होणार असे जे काही सांगितले ते बरोबर नाही कारण यासंदर्भात अद्याप आराखडाच तयार झालेला नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी बाबासाहेबांचे स्मारक कसे व्हावे यासंदर्भात ज्या भावना मांडलेल्या आहेत त्याला माझा पाठिंबा आहे. परंतु बाबासाहेबांचे भव्य स्मारक होण्यासाठी, त्यासाठी जागा मिळण्यासाठी 56 वर्ष लागली याचे मला दु:ख आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महानिर्वाण 1956 साली झाले व 56 वर्षानंतरही बाबासाहेबांचे भव्य स्मारक झाले नाही त्याबद्दल मला दु:ख आहे. इंदू मिलच्या जागेसंदर्भात श्री. प्रकाश आंबेडकर, श्री. आनंद आंबेडकर यांनी निदर्शने केली होती. गेल्या वर्षी त्यांनी इंदू मिलचा ताबा घेतला होतो.

उप सभापती : इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक बांधण्याच्या संदर्भातील चर्चेला येथे सुरुवात झालेली आहे. हा विषय अतिशय सेन्सेटीव्ह आहे. त्यामुळे कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी कोणत्याही सन्माननीय सदस्यांच्या भाषणावर आक्षेप घेऊ नये अशी मी आपल्या सर्वांना पुन्हा विनंती करतो.

श्री. विजय गिरकर : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात मी 16 ऑक्टोबर, 2012 रोजी उपोषण केले होते. इंदू मिलची जागा आम्हाला सहजासहजी मिळालेली नाही. महाराष्ट्रातील आंबेडकरी जनतेला त्यासाठी लढा उभारावा लागला, आंदोलने करावी लागली व त्यानंतरच इंदू मिलची जागा आम्हाला ताब्यात मिळालेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संदर्भात इंदू

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय गिरकर ....

मिलच्या जागेच्या बाबतीतच हे घडले आहे असे नाही तर 1956 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे निधन झाल्यानंतर त्यांना भारतरत्न पुरस्कार मिळण्यासाठी 1990 साल उजाडावे लागले होते. बाबासाहेबांचे तैलचित्र लोकसभेत 1990 साली लावले गेले. एवढेच नाही तर ज्या बाबासाहेबांनी 1956 साली बौध्द धर्माची दीक्षा घेतली त्या नवबौध्दांना सवलती मिळण्यासाठी सुध्दा 1990 साल उजाडावे लागले. नव बोध्दांच्या तीन पिढया म्हणजे जवळ जवळ 34 वर्षानंतर नवबौध्दांना सवलती मिळावयास सुरुवात झाली.

सभापती महोदय, बाबासाहेब हे क्रांती सूर्य होते. कोलंबिया विद्यापीठात 200 विद्यार्थ्यांमध्ये एक नंबरचा आयडॉल डॉ. बाबासाहेबांना जाहीर करण्यात आला होता. अशा महामानवाचे स्मारक उभे होण्यासाठी, जागा मिळण्यासाठी 56 वर्षे लागली त्याचे मला दु:ख होत आहे.

सभापती महोदय, व्ही.पी.सिंग सरकारला भाजपाने पाठिंबा दिल्यानंतर व्ही.पी.सिंगांचे सरकार अस्तित्वात आले. त्यावेळेस भाजपाने पाठिंबा दिल्यामुळेच बाबासाहेबांना 1990 मध्ये भारतरत्न पुरस्कार मिळू शकला, लोकसभेतही बाबासाहेबांचे तैलचित्र लागू शकले व नवबौध्दांनाही 1990 मध्येच सवलती मिळण्यास सुरुवात झाली.

सभापती महोदय, माननीय अटलजी यांचे केंद्रात सरकार होते त्यावेळेस इंदू मिलचा प्रश्न ऐरणीवर आला व त्यांनी तो मान्य केला. एवढेच नाही तर बाबासाहेबांचे दिल्लीतील अलीपूर येथे निधन झाले,ज्या ठिकाणी बाबासाहेबांनी भारताची घटना लिहिली गेली ती जागाही माननीय अटलजींनी मिळवली होती. परंतु त्यासाठी या शासनाने फंड उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्या ठिकाणी अद्याप स्मारक उभे राहू शकले नाही. 56 वर्षानंतर का होईना इंदू मिल येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक उभे करावे अशी माझी आपल्या मार्फत शासनाला विनंती आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर...

नालंदा, तक्षशीला विद्यापीठे आपल्याकडे होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली असल्यामुळे नालंदा, तक्षशीला विद्यापीठा प्रमाणे पाली भाषेतील भव्य विश्व विद्यालय देखील येथे स्थापन झाले पाहिजे अशी मी येथे मागणी करीत आहे. चीन येथून नालंदा विद्यापीठात युऑन साँग आला होता. या देशातून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भगवान गौतम बौद्धाच्या तत्व ज्ञानाचा प्रसार जगभरात केला. त्या भाषेचे विद्यापीठ या इंदू मिलच्या जागेत उभारावे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची मोठी लायब्ररी होती हे आपणा सर्वांना माहीत आहे. तशाच प्रकारची लायब्ररी येथे देखील झाली पाहिजे. पाच हजार लोक विपश्यनेला बसतील एवढे मोठे सभागृह या जागेत उभारले पाहिजे. या स्मारकाच्या जागेसाठी 1400 कोटी रूपये द्यावे लागले. एवढी मोठी रक्कम दिल्यानंतर इंदू मिलची जागा ताब्यात येते हे योग्य नव्हे. देशात अन्य जे नेते झाले मग ते कुठल्याही घराण्याचे असतील..... मला त्यांची नावे घ्यायची नाहीत. दिल्लीमध्ये गेला तर तेथे भव्य स्मारके झाल्याचे पहायला मिळते. त्यासाठी हजारो एकर जागा दिलेली आहे. परंतु, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाला जागा देण्यासाठी 56 वर्ष लागतात. हजारो एकर जागा तेथे दिली आहे. पण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक व्हायला 56 वर्षे लागतात. असे असताना या स्मारकासाठी अजून निधीची तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे या स्मारकासाठी एकाच वेळी खूप मोठ्या निधीची तरतूद झाली पाहिजे. या विषयाचा फायदा ज्याला कोणाला घ्यायचा असेल त्यांनी तो जरूर घ्यावा. कोणाला क्रेडिट घ्यायचे असेल ते त्याने घ्यावे. संपूर्ण जगासाठी मानबिंदू ठरेल असे स्मारक आपण बांधले पाहिजे. स्मारकाला जागा देण्यासाठी 56 वर्षे लागली आहेत. त्यामुळे हे स्मारक व्हायला 56 वर्षे लागता कामा नये अशा प्रकारची विनंती करतो व पुन्हा एकदा स्वागत करून मी थांबतो. धन्यवाद.

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांना भाषण करण्यास मी अनुमती देत आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माझ्या अगोदर सन्माननीय सदस्य ॲड.जयदेव गायकवाड आणि श्री.राम पंडागळे यांना बोलण्यास आपण अनुमती द्यावी.

उप सभापती : ज्या क्रमाने माझ्याकडे नावे आली आहेत त्या क्रमाने मी सर्वांना बोलण्यास संधी देणार आहे. मी कुणालाही मध्ये बोलण्यास संधी देणार नाही. ...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मी आपल्याला विनंती करतो की, आमच्या पक्षातर्फे माझ्या अगोदर ज्या सन्माननीय सदस्यांची नावे आहेत त्यांना बोलण्यास अनुमती द्यावी.

उप सभापती : त्यांचे नाव ज्या क्रमावर असेल त्या क्रमावर त्यांना बोलण्यास मिळेल.

श्री.हेमंत टकले : ठीक आहे.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकडवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आदरणीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार सन्माननीय सदस्य व मित्रहो, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक मुंबईतील इंदू मिलच्या जागेत करीत आहोत. या स्मारकासाठी इंदू मिलची जागा मिळविण्यामध्ये निश्चित असे यश प्राप्त झाले आहे. मी येथे असे सांगू इच्छितो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला सर्वोच्च अशी घटना दिली. भारतीय लोकशाहीमध्ये सदर राज्य घटना दीपस्तंभा प्रमाणे जनतेला मार्गदर्शन करीत असते. या देशाची लोकशाही डॉ.बाबासाहेबांच्या विचाराने चालत आहे. लोकशाही जीवनामध्ये निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरे राज्य घटनेतून मिळतात. अशा या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आपण स्मारक निर्माण करीत आहोत. अशी स्मारके ही खऱ्या अर्थाने नव्या पिढीला स्फूर्ती देत असतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सारख्या एका महान विचारवंताने, नेत्याने या देशातील हजारो वर्षाची गुलामगिरी, अस्पृश्यता नष्ट केली. या देशात एकेकाळी विषमतेवर आधारित समाजव्यवस्था होती. या समाज व्यवस्थेमध्ये बदल झाला पाहिजे, समतेवर आधारित नवीन समाज निर्माण झाला पाहिजे, अशा प्रकारचा सिद्धांत राज्य घटनेमध्ये मांडला.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड...

त्यानंतर आपण पाहत आहोत की, 62 वर्षाच्या कालखंडामध्ये जे काही बदल वा परिवर्तन आले ते अतिशय नेत्रदीपक असे आहेत.

सभापती महोदय, एकेकाळी या देशामध्ये अस्पृश्य व्यक्तीला स्पर्श करणे वर्ज्य होते, पाणी मागितले तरी त्याची जात विचारली जात होती. जातीवर आधारलेली विषमता होती. परंतु परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राज्य घटना आणल्यानंतर समाजामध्ये बदल झाले आता ती जातीयता पहावयास मिळत नाही. परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आणलेल्या राज्य घटनेमुळे समाजामध्ये परिवर्तन झालेच तसेच महिलांना देखील समानतेचा अधिकार प्राप्त झाला. राज्य घटनेमुळे देशामध्ये झालेले बदल हे अतिशय नेत्रदीपक आहेत. तेव्हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक आपणा सर्वांना प्रेरणादायी असणार आहे.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मी एवढेच सांगू इच्छितो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाची मागणी कोणी केली, कधी केली, याचे क्रेडीट कोणाला मिळाले पाहिजे याचा विचार करता कामा नये. जातीच्या पलीकडे जाऊन, पक्षाच्या तत्त्वज्ञानाच्या पलीकडे जाऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाकडे आपण पाहिले पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक मुंबईत होणार असले तरी या स्मारकामुळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक समृध्दीमध्ये भर पडणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक पाहण्यासाठी देशातील तसेच परदेशातील लोक येतील त्यांना डॉ.बाबासाहेबांचे स्मारक पाहून या महामानवाने समाजातील विषमता नष्ट केली अशाप्रकारचा एक समतेचा संदेश मिळणार आहे. डॉ.बाबासाहेबांचे स्मारक पाहून त्यांनी केलेल्या उत्तुंग कार्याची माहिती होऊन समाजामध्ये समतेचा संदेश जाणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक मुंबईमध्ये होत असल्यामुळे मुंबई शहराच्या समृध्दीमध्ये भर पडणार आहे. मुंबई शहराचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर होणार आहे असे मला वाटते. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक होण्यासाठी कोणी पुढाकार घेतला याबाबत कोणी क्रेडीट घेण्याचा प्रयत्न करु नये.

सभापती महोदय, सन 2010 पर्यंत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक व्हावे असा कोणी विचार केला नव्हता. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या निमित्ताने केंद्रीय कृषी मंत्री आदरणीय श्री.शरद पवार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली एक सनद करण्यात आली. त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड...

सनदेमधील पहिले कलम हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक होण्यासाठी इंदू मिलची जागा मिळाली पाहिजे असे होते. त्यानंतरच्या काळात काँग्रेसने देखील त्यांच्या सामाजिक परिषदेमध्ये हा विषय मांडला. त्यांनतर माननीय उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार व श्री.मधुकरराव पिचड यांच्या नेतृत्वाखाली आम्ही माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे गेलो. मी आपणास क्रोनॉलॉजी सांगत आहे. मी याठिकाणी कबूल करतो की, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या प्रश्नाला महत्व देऊन तसेच माननीय उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार व माननीय श्री.मधुकरराव पिचड साहेब यांना विश्वासात घेऊन त्यांनी हा प्रश्न माननीय पंतप्रधानांकडे मांडल्यामुळे या प्रश्नाला गती मिळाली. त्यानंतर राजकारणातील अनेकांनी या हेतू बद्दल शंका व्यक्त करुन मतावर डोळा आहे काय अशी चर्चा केली. आपण ही चर्चा बाजूला ठेवू या.

सभापती महोदय, राष्ट्रवादी काँग्रेसने त्यांच्या सनदेमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक होण्यासाठी इंदू मिलची जागा मिळविण्याचा प्रयत्न केला यामागे काही राजकीय हेतू दिसत आहे अशा प्रकारची चर्चा देखील काही वृत्त वाहिन्यांवर झाली होती. परंतु आम्ही त्या गोष्टीकडे दुर्लक्ष केले. माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी पुढाकार घेऊन हा प्रश्न धसास लावण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी केंद्रीय कृषी मंत्री आदरणीय श्री.शरद पवार साहेब यांचे सहकार्य घेतले. आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी देखील यामध्ये बहुमोल कामगिरी केलेली आहे. मी या ठिकाणी एवढेच सांगू इच्छितो की, हा क्रेडीट घेण्याचा प्रश्न नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर कोणा एका पक्षाचा अधिकार नाही. ते संपूर्ण भारत देशाचे आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक केले म्हणून त्याचा राजकीय फायदा होणार आहे अशा प्रकारचा विचार कोणी करु नये. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक शेकडो वर्षे राहणार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकामुळे त्यांनी केलेल्या उत्तुंग कार्याची माहिती अनेक वर्षे लोकांसमोर राहणार आहे.

सभापती महोदय, या निमित्ताने मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, कोकणामध्ये एक चर्च आहे.

यानंतर श्री.सरफरे..

अशुद्धीरत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ॲड. जयदेव गायकवाड...

फादर दिब्रटो यांनी तो चर्च बांधला. त्या चर्चमध्ये आम्हाला "मी प्रथम भारतीय आहे आणि नंतरही भारतीय आहे" असे वाचावयास मिळाले.डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राज्य घटनेमध्ये देखील "आम्ही सर्व प्रथम भारतीय आहोत" असे म्हटले आहे. म्हणजे या देशातील सर्व हिंदू, मुस्लिम, शीख असलो तरी सर्वप्रथम आपण भारतीय आहोत. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विश्वास या देशातील जनतेवर होता. "We the People of India." आम्ही भारतीय लोक आहोत" एवढेच नव्हेतर मला हे सांगण्यास आवडेल की, आपण राज्य घटनेच्या निर्मितीचा इतिहास पाहिला तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे उच्च कोटीचे देशभक्त होते याची प्रचिती आपल्याला मिळते. राज्य घटनेची निर्मिती झाल्यानंतर त्यांनी केलेल्या पहिल्या भाषणामध्ये असे विचार मांडले होते की, "At the time of deciding the destiny of nation, the dignity of party or the dignity of the people should not be considered." आपण देशाच्या भवितव्याचा विचार करीत असतांना माणूस, व्यक्ती किंवा नेता यांच्याबाबत विचार करण्याची गरज नाही तर देशाचा विचार प्रथम केला पाहिजे.

सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा सांगून माझे भाषण संपविणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबई शहरामध्ये स्मारक करीत असतांना स्फूर्तीदायक गोष्ट आपल्याला सांगितली पाहिजे. भारतीय राज्य घटना तयार करीत असतांना या देशाचे नाव कोणते असावे यावर देखील सखोल चर्चा करण्यात आली. या देशाचे नाव "युनायटेड स्टेट ऑफ इंडिया" असे ठेवावे अशाप्रकारे वेगवेगळी नावे सुचविण्यात आली होती. त्यासंबंधीचा उल्लेख भारतीय राज्य घटनेच्या कलम 1 मध्ये आहे. सभापती महोदय, मला आपल्याला सांगण्यास अभिमान वाटतो की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाचे नाव "भारत" असेल असे सांगितले. याची खात्री करण्याकरिता आपण त्या चर्चेचे डिबेट उघडून पहावे त्यामध्ये निश्चितपणे झालेली नोंद आपणास पहावयास मिळेल. अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशाचे नाव "भारत" ठेवले. त्यामुळे आपण या स्मारकाची उभारणी करीत असतांना तशाप्रकारची भूमिका निश्चितपणे ठेवली पाहिजे. हे स्मारक उभे राहिल्यानंतर त्यामधून चांगला संदेश आणि स्फूर्ती लोकांपर्यंत जाणे आवश्यक आहे. काही लोक या स्मारकांची तुलना विनाकारण करीत आहेत. काही लोक हे स्मारक छोटे-मोठे झाले पाहिजे असे म्हणत आहेत. अशाप्रकारे या स्मारकाची तुलना आपण करता कामा नये. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्या काळात एक आज्ञापत्र काढले होते त्यामध्ये त्यांनी जनतेला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. जयदेव गायकवाड...

आणि सैन्याला आदेश दिले होते की, आपण शेतामधून जात असतांना शेताच्या बांधावरुन जावे, विनाकारण शेतकऱ्याच्या पिकांचे नुकसान करु नये. तशाप्रकारची भूमिका, विचार डायरेक्टिव्ह प्रिन्सिपलमध्ये आपल्याला पहावयास मिळतात. भारतीय घटनेमध्ये सामाजिक न्यायाचे तत्व अभिप्रेत असलेले आपल्याला पहावयास मिळते. आपल्या दैनंदिन राजकीय जीवनामध्ये....

उपसभापती : मी माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणू इच्छितो की, या प्रस्तावावरील चर्चेमध्ये भाग घेण्याकरिता अनेक माननीय सदस्यांनी नावे दिलेली आहेत. सभागृहाची सकाळच्या सत्राची वेळ 11.45 वाजेपर्यंत आहे. त्यामुळे प्रत्येक माननीय सदस्यांनी आपल्या भावना संक्षिप्त शब्दामध्ये व्यक्त कराव्यात अशी विनंती करतो.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, आजच्या प्रस्तावामधील चर्चेचा विषय मोठा आहे...

उपसभापती : मी आपल्या सर्वाच्या भावनेशी सहमत आहे, फक्त माननीय सदस्यांनी भाषण करीत असतांना वेळेचे बंधन पाळावे अशी विनंती केली आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माझी देखील तशीच भूमिका आहे. एखाद्यावेळी सभागृहापुढील महत्वाच्या विषयावरील चर्चेच्यावेळी त्या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन माननीय सदस्यांना चचेर्मध्ये भाग घेण्याकरिता कामकाजाची वेळ वाढविण्यात आलेली आहे. आज या ठिकाणी एक ऐतिहासिक महत्वाचा निर्णय होत असतांना सर्व माननीय सदस्यांना आपल्या भावना व्यक्त करण्याची संधी मिळावी याकरिता आपण सभागृहाच्या कामकाजाची वेळ वाढवावी अशी माझी आपणास विनंती आहे.

उपसभापती : ठीक आहे.

ॲड. जयदेव गायकवाड : सभापती महोदय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण 1956 मध्ये झाले. त्यानंतर हे स्मारक झाले पाहिजे या करिता अनेक नेत्यांनी मागणी केली. प्रत्येक भारतीयाला हे स्मारक लवकर व्हावे असे वाटत होते परंतु त्याला उशीर झाला आहे. याबाबत मी निश्चितपणे कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे श्रेय आहे असे म्हणणार नाही त्याचबरोबर विरोधी पक्षाच्या समविचारी लोकांना सुध्दा याचे श्रेय दिले पाहिजे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अशुद्धीत मत / शोधनासाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड . . . .

कारण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी जी भूमिका मांडली, ती सर्व जनतेच्या दृष्टीने पूरक अशीच होती. त्यामुळे इंदू मिलमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे लवकरात लवकर स्मारक बांधण्यात यावे अशा प्रकारची मी याठिकाणी अपेक्षा व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

आय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, आज सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी इंदू मिलच्या जागेमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभे करण्याबाबतचा प्रस्ताव मांडला आहे. श्रध्दा आणि विचार या मधूनच प्रबोधनाच्या चळवळी पुढे जात असतात.या इंदू मिलमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभे करण्याच्या बाबतीत गेले वर्षभर रेटा लावण्यात आला आणि विशेषत: दोन्ही सभागृहांमध्ये अशा स्वरुपाचा ठराव एकमताने मंजूर झाला आणि त्यामुळे आता पाठीमागे वळून पहाताना निश्चितपणे असे वाटते की, मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरासाठी ज्याप्रकारे प्रचंड संघर्ष झाला. तसा संघर्ष करण्याऐवजी आपण सर्वजण संमतीवर फार लवकर आलो हे महाराष्ट्रामध्ये प्रबोधनाच्या चळवळीला वेगळ्या प्रकारचे मिळालेले वळण आहे असे मला याठिकाणी नमूद करावेसे वाटते.

सभापती महोदय,याबाबतीत सांगावयाचे तर या कामासाठी अनेक वेगवेगळया संघटनांनी आंदोलने केली. मला येथे उल्लेख केला पाहिजे की, आज या सदनामध्ये असलेल्या अनेक सन्माननीय सदस्यांनी यासाठी प्रयत्न केले आहेत ही बाब देखील खरी आहे हे मला देखील नमूद करावयास पाहिजे आणि ते श्रेयासाठी म्हणून नव्हे, परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणाच्या दिवशी जे लक्षावधी लोक चैत्यभूमीवर त्यांना अभिवादन करण्यासाठी येत असतात. त्यावेळी ते प्रार्थना म्हणतात, दर्शन घेतात आणि परत जातात. त्यातून एक वेगळया पध्दतीने धम्मचक्र प्रवर्तनाचा विचार महाराष्ट्राभर पोहोचत असतो. विशेषत: ज्यांना शिक्षणाचा वारसाही मिळालेला नाही अशा वेळी खेड्यातील सामान्य लोक लांब अंतरावरुन मुंबईमध्ये येऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना भीमवंदना देतात. तसेच मी अनेक वेळा दलित नेत्यांकडून ऐकलेले आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे फक्त दलित समाजाचे नेते नव्हते.

सभापती महोदय, याठिकाणी मला नमूद केले पाहिजे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू कोड बिलासाठी प्रयत्न केले होते त्यामध्ये मिताक्षरी आणि दायभाग अशा प्रकारचे कायदे होते, त्या कायद्यांचे संहितीकरण करुन हिंदू स्त्रियांना समान स्वरुपामध्ये कायदे लागू व्हावेत या दृष्टीकोनातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे खूप मोठे योगदान होते.आपण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यासाठी "भारत रत्न" असा शब्द वापरतो. पण प्रत्यक्षात जात नाही ती जात आणि जाती संस्थेच्या चौकटीमधूनच एका बाजूला आपण पहातो की, संसदीय आणि विशेषत: जे प्रस्थापित राजकारण आहे ते आपल्याला जातीच्या चौकटीतूनच एका बाजूला जाताना दिसते. त्याच्याच मुळे हा प्रश्न तयार होतो. तेव्हा दोन्ही सदना मध्ये एकमताने ठराव झाल्यानंतर सदरहू

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्मारक झाले हे खरे आहे. सन्माननीय पंतप्रधान यांनी यासंदर्भात देखील एक सकारात्मक भूमिका घेतली. परंतु मला याठिकाणी मुद्दाम नमूद केले पाहिजे की, श्री.आनंदराज आंबेडकर, श्री.प्रकाश आंबेडकर, श्री.रामदास आठवले या सर्व नेत्यांनी या विधीमंडळामध्ये सुध्दा या निर्णयाची प्रत्यक्षपणे अंमलबजावणी करण्यासाठी जे अतिशय आक्रमक प्रयत्न केले आहेत त्यामुळेच विधीमंडळामध्ये सुध्दा या निर्णयाची प्रत्यक्षपणे अंमलबजावणी करणे ..

(सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे खाली बसून बोलतात.)

मी सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांना सांगू इच्छिते की, जर त्यांना काही बोलावयाचे असेल तर ते उभे राहून बोलू शकतात. परंतु श्री.आनंदराज आंबेडकर, श्री.प्रकाश आंबेडकर आणि श्री.रामदास आठवले यांनी आंदोलन केले ही वस्तुस्थिती आहे.

(सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे खाली बसून बोलतात.)

मी श्री.विजय कांबळे यांच्याबाबत बोलणार आहे आणि मी त्यांना ओळखते. मला तेवढे राजकीय ज्ञान आहे. परंतु श्री.विजय कांबळे हे इंदू मिलच्या भिंतीवर ....

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

मी आपल्याला सांगू इच्छिते की,श्री.आनंदराज आंबेडकर जसे इंदू मिलच्या भिंतीवर चढले तसे श्री.विजय कांबळे तेवढे आक्रमक झाले नाहीत असे मी म्हटले तर ते वस्तुस्थितीला सोडून होणार नाही. त्याचबरोबर मला हे देखील सांगितले पाहिजे की, ...

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात.)

उप सभापती : मी एकदा सांगितले आहे की, सदनामध्ये अत्यंत महत्वाच्या प्रस्तावावर चर्चा सुरु आहे. कृपया सन्माननीय सदस्यांच्या भाषणामध्ये व्यत्यय आणू नये.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी कोणाला श्रेय देते यावर त्यांचे लक्ष आहे आणि ते माझे भाषण काळजीपूर्वक ऐकत आहेत त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

श्री.भाई जगताप (खाली बसून) : आम्ही नेहमीच तुमच्या भाषणाचा शब्द अन् शब्द काळजीपूर्वक ऐकत असतो.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.बरवड . . ..

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य माझा वेळ वाया घालवित आहेत आणि या चर्चेचे गांभीर्य घालवित आहेत म्हणून मी आपल्याकडे बघून बोलणार आहे. सभापती महोदय, सरळ मार्गाने बोलले तर त्यांना कळतच नाही. आरडाओरड करुन खरडपट्टी काढल्याशिवाय त्यांना कळतच नाही. सन्माननीय सदस्यांनी मध्येमध्ये न बोलता शांत राहावे.

(माननीय मंत्री प्रा. ढोबळे बसून बोलण्याचा प्रयत्न करतात)

उप सभापती : माननीय मंत्री महोदय प्रा. ढोबळे यांना सांगू इच्छितो की, आपण सन्माननीय मंत्री आहात. या ठिकाणी सन्माननीय सदस्या भाषण करीत आहेत.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या प्रसंगाचे गांभीर्य जपण्याचा प्रयत्न सन्माननीय सदस्यांनी करावा.

उप सभापती : मी तेच सांगत आहे. मी त्यापेक्षा वेगळे काही सांगत नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, यामध्ये प्रश्न असा आहे की, दलित चळवळीचा रेटा जर सभागृहामध्ये ....

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, या ठिकाणी महत्वाच्या विषयावर चर्चा चालू आहे. माननीय मंत्री महोदय प्रा. ढोबळे यांना सांगू इच्छितो की, आपण मंत्री आहात. त्यांनी टोमणे मारणे बंद करुन या प्रसंगाचे गांभीर्य लक्षात घ्यावे अशी मी आपल्या वतीने त्यांना विनंती करतो.

उप सभापती : धन्यवाद. सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मघाशी माझा मुद्दा असा होता की, आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संदर्भात भारतरत्न हा शब्द वापरतो आणि विशेषत: दलितेतर समाजातील ज्या स्त्री कार्यकर्त्या असतात त्यांच्याकडून नेहमीच अशी अपेक्षा केली जाते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान त्यांनी मान्य करावे. मुळात मला सांगावयास पाहिजे की, आम्ही काम करु शकतो याचे महत्वाचे कारण म्हणजे स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळण्यापासून ते हिंदू कोड बिलापर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कार्य केलेले आहे. परंतु दुर्दैवाने ज्या वेळेला समाज म्हणून आपण विचार करु लागतो त्यावेळी एका बाजूला स्मारके ही श्रध्देचा भाग म्हणून आवश्यकच असतात. स्मारकामुळे सर्व अनुयायी असतील, त्यांच्यापासून प्रेरणा मिळणारे घटक असतील, त्या कोणालाही काम करीत असताना प्रत्येक वेळेला स्मरण होणे क्रमप्राप्त असते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG

डॉ. नीलम गोऱ्हे ....

पण त्याचवेळी वस्तुस्थितीत आपल्याला हे देखील चित्र दिसते की, दलित महिलांवर होणारे अत्याचार असतील किंवा अनेक ठिकाणी निर्णय प्रक्रियेमध्ये मिळणारी संधी असेल त्यात दलित महिला असो, दलित पुरुष असो, त्यांना त्यांची जागा म्हणजे समाजाच्या सामाजिक उतरंडीमध्ये दलित समाजाच्या कार्यकर्त्यांची काय जागा आहे, ती जागा त्यांना पूर्णत: मिळते की नाही याबद्दल त्यांनी त्यांच्या मनामध्ये जरुर विचार करावा. राजकीय निर्णय प्रक्रियेमध्ये दलित चळवळीला, दलितांच्या प्रश्नांना खरोखर कितपत प्रतिष्ठा मिळते याचा त्यांनी विचार करावा. मग हा प्रश्न जरुर निर्माण होतो की, प्रत्यक्षामध्ये दलितांवर अत्याचार झाल्यानंतर ते सिध्द होण्याचे प्रमाण अडीच टक्के सुध्दा नाही. दुसरीकडे आपल्याला असेही चित्र दिसते की, अत्याचारामध्ये सुध्दा दलित महिलांवर अधिक प्रमाणात अत्याचार होताना दिसतात. म्हणून आपण ही जी स्मारके उभी करतो त्या बाबतीत मला असे खास सुचवावेसे वाटते की, दलित महिलांच्या विकासाच्या दृष्टीकोनातून त्यात खास संशोधनात्मक असा एक विभाग असला पाहिजे. चैत्यभूमीवर येणारे जे बांधव आहेत त्या बांधवाना तेथून परत जात असताना किंवा परत परत अभ्यासासाठी येण्याबरोबरच मुंबईचे वैभव वाढविणारे हे एक वेगळ्या प्रकारचे असावे याकडे मला खासकरुन लक्ष वेधावेसे वाटते.

या संदर्भामध्ये आमच्या शिवसेनेची भूमिका सर्वांना ज्ञात आहे. आम्ही दोन्ही सभागृहामध्ये पाठिंबा दिला होता. परंतु श्री. रामदास आठवले यांनी शिवशक्ती-भीमशक्तीची भूमिका घेतल्यावर प्रत्यक्ष चळवळीमध्ये उतरण्याच्या कामाला चालना मिळाली. यासाठी मी एका व्यक्तीची साक्ष या सभागृहाच्या रेकॉर्डवर नोंदवू इच्छिते. आयबीएन लोकमत वाहिनीवर बोलत असताना श्री. महेंद्र साळवे, पाहिजे तर आपण नाव घालू नका पण काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले आणि ते आम्ही स्वत: ऐकले. आपल्यापैकी अनेकांनी ऐकले असेल. मला असे वाटते की, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप त्या कार्यक्रमाला उपस्थित होते. श्री. साळवे याच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी काँग्रेसच्या अध्यक्षांना असे सांगितले की, श्री. रामदास आठवले हे शिवसेनेबरोबर गेल्यामुळे दलित चळवळीला जर काही टर्न द्यावयाचा असेल तर हा विषय आपण आपल्या मॅनिफेस्टोमध्ये घालू या. हे आम्ही सगळ्यांनी ऐकले.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : यामध्ये हरकतीचा प्रश्न नाही. आपण माझे म्हणणे पूर्ण होऊ द्यावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात माझ्या नावाचा उल्लेख केलेला आहे. या सभागृहामध्ये एका पवित्र विषयाच्या संदर्भात चर्चा होत असताना किंवा आपल्या भावना व्यक्त करीत असताना अशी काही शेरेबाजी होऊ नये जेणेकरुन या मोठ्या आणि पवित्र विषयाचे गांभीर्य कोठे तरी हरवेल. माझ्यासह सर्व सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे. आपण जर इतिहासाची पाने उलटावयास लागलो तर आम्हाला सुध्दा खूप पाने उलटता येतील. या वर्षभरातीलच नव्हे तर गेल्या 120 वर्षातील पाने सुध्दा आम्हाला उलटता येतील याची फक्त त्यांनी नोंद घ्यावी.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भाई जगताप ...

कुणी तरी कुणाचा तरी संदर्भ देण्याचा प्रयत्न करुन नये. याचे कारण असे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बाबतीत यांच्यासहीत आता असलेल्या शक्तींनी केलेली वक्तव्ये, आम्ही विसरलो नाहीत, कोणीही विसरलेले नाही, दलित जनता ती वक्तव्ये विसरलेली नाही. त्यामुळे आम्हाला देखील या बाबतीत बरेच काही बोलता येईल. म्हणून माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, या सभागृहामध्ये एका पवित्र विषयावर चर्चा होत असताना त्याला दुसरे वळण लागता कामा नये.

डॉ. नीलम गो-हे : सन्माननीय सदस्यांनी "माझ्यासहीत" असा उल्लेख केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संदर्भात मी काय वक्तव्य केले हे सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी सांगितले पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात गंभीर आणि घाणेरडा आरोप केलेला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराच्या योगदानाच्या संदर्भामध्ये मी नम्रपणे नमूद करु इच्छिते की, मायावतींचा उदय होण्याच्याआधी देखील महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीमध्ये आम्ही जे काही काम केलेले आहे त्याबद्दल आम्हाला कोणाच्या सर्टिफिकेटची आवश्यकता नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल माझ्यासहीत काय काय वक्तव्ये केलेली आहेत हे सन्माननीय सदस्यांनी आताच्या आता सांगावे. वाटेल ते आरोप आम्ही ऐकून घेणार नाही.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रस्तावावर बोलावे.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, कोणीही हरकतीचा मुद्दा सांगून उभे रहायचे आणि आरोप करायचे असा प्रकार चालू आहे. महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रबोधनकार ठाकरे अशा समाजसुधारकांच्या बाबतीत आमच्या पक्षाच्या सर्वच मंडळींनी, तसेच स्त्री चळवळीतील सर्वच महिला कार्यकर्त्यांनी प्रचंड असा आदर ठेवूनच काम केलेले आहे. मला या गोष्टीची खंत वाटते की, एखादी वस्तुस्थिती मांडत असताना त्याला शेरेबाजी म्हणणे योग्य नाही.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी आता प्रस्तावावर बोलावे अशी माझी त्यांना विनंती आहे.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, मला इतकेच सांगायचे आहे की, राजकीय श्रेय घेण्याचा प्रयत्न करु नका असे म्हणत म्हणत प्रत्येक जण त्याच पध्दतीने चालला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक कशा पध्दतीचे असावे यासंबंधीची चर्चा सुरु आहे. याबाबतीत माझी अशी सूचना आहे की, आपण सर्वपक्षीय लोकांची किंवा कोणत्याही पक्षाचे नसलेल्या सामाजिक कार्यकत्यांची एक समिती नेमून ते स्मारक उभारण्याचे काम व्यावहारिक शिस्तीने आणि वेगाने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे...

करावे. दादर परिसरामध्ये हे जे स्मारक होत आहे त्याबद्दल मी सरकारचे निश्चितच कौतुक करते. तसेच दलितांचे प्रश्न सोडविताना न्यायाची अंमलबजावणी झाली पाहिजे अशी आमची अपेक्षा आहे. केवळ राजकीय श्रेयापोटी जी अस्वस्थता दिसून येत आहे ती दिसता कामा नये. मुळात हा विषय विजय कांबळे यांनी सुरु केला होता ही वस्तुस्थिती आहे. त्यांनी त्यांचा विचार मांडला होता. त्या विचारांच्या पाठीमागे बाकीच्या नेत्यांचा रेटा नसता, आणि विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहामध्ये एकमत झाले नसते तर त्या प्रश्नाला वेगळी कलाटणी मिळाली असती. या विषयी टीडीआर देऊन निर्णय घ्यावा लागला ही जरी वस्तुस्थिती असली तरी सुध्दा एखादा प्रश्न विधिमंडळामध्ये तडीस जाऊ शकतो याकडे मी लक्ष वेधते. महिला चळवळीच्या माध्यमातून आम्ही डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे योगदान मानतो. परंतु दलित चळवळीमध्ये मनुस्मृती नाकारता नाकारता स्वत:च्या मनातील पुरुषप्रधानता किती दूर झालेली आहे याचा विचार महात्मा फुले आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेणा-या प्रत्येक व्यक्तीने करावा एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

--

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहरात महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक व्हावे, त्यासाठी केंद्र शासनाच्या अखत्यारित असलेली इंदू मिलची जागा या ऐतिहासिक अशा भव्य स्मारकास मिळावी या राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी एकमताने केलेल्या ठरावाची आणि राज्यातील जनतेची भावना लक्षात घेऊन माननीय मुख्यमंत्री यांनी देशाचे पंतप्रधान आणि वस्त्रौद्योग मंत्री, भारत सरकार यांचेकडे पाठपुरावा केल्यानंतर ही मागणी केंद्र शासनाने मान्य केलेली आहे. एनटीसीच्या जागेवर असलेली इंदू मिलची जागा राज्य शासनाने स्मारकासाठी अधिग्रहण करुन त्यावर आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभे करण्यासाठी प्राधिकरणाची स्थापना व निधीची तरतूद करुन हे स्मारक लवकरात लवकर पूर्ण करावे अशा प्रकारचा प्रस्ताव सभागृहात मांडलेला आहे, त्या प्रस्तावास समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, दादर येथील चैत्यभूमीची जागा अतिशय कमी आहे. चैत्यभूमीवरील जागेत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे दर्शन घेण्यासाठी मोठया प्रमाणात भीम सैनिक येतात. आंबेडकरी विचाराची जनता दर्शनासाठी येत असते, राज्यातीलच नव्हे तर इतर राज्यातूनही बरेच अनुयायी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे दर्शन घेण्यासाठी येतात. परंतु चैत्यभूमीची जागा अत्यंत कमी असल्याने दर्शनासाठी येणाऱ्या देश-विदेशातून येणाऱ्या अनुयायांना पुरेशा सुविधा पुरवू शकत नाही. म्हणून जवळपासची जागा चैत्यभूमीला मिळाली पाहिजे अशी चर्चा अनेक वर्षापासून आपण ऐकत होतो. इंदू मिलचे राष्ट्रीयकरण करुन केंद्र शासनाने ती मिल आपल्या ताब्यात घेतली. ती मिल चालू करण्यात येईल या कारणासाठी केंद्राने ही मिल आपल्या ताब्यात घेतली. इंदू मिलची जागा ताब्यात घेऊन ती जागा चैत्यभूमीला देण्याचे काम अतिशय किचकटीचे होते.

महोदय, माननीय श्री.पृथ्वीराज चव्हाण हे महाराष्ट्रात मुख्यमंत्री पदावर विराजमान झाले. महाराष्ट्राचे केंद्र शासनाकडे महत्वाचे प्रश्न प्रलंबित आहेत, ते प्रश्न सोडवून घेण्याच्या दृष्टीकोनातून माननीय मुख्यमंत्र्यांनी मोठया प्रमाणात प्रयत्न केले. महाराष्ट्रातील बरेच अडचणीचे प्रश्न सोडविण्यामध्ये त्यांना यश आलेले आहे हे या सदनातील सर्व सदस्यांना माहिती आहे. ही गोष्ट महाराष्ट्रातील जनतेला माहिती आहे. इंदू मिलच्या जागेच्या संदर्भात महाराष्ट्रातील जनतेला आशा निर्माण झाली होती की, केंद्र शासनाकडून सर्व बाबींची पूर्तता करुन घेऊन ही जागा माननीय

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे..

मुख्यमंत्री निश्चितपणे चैत्यभूमीसाठी मिळवून देतील. या बाबतीत स्वागताई निर्णय होईल असा विश्वास तुम्हा, आम्हांमध्ये होता याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय स्मारक व्हावे यासाठी इंदू मिलची संपूर्ण जागा मिळावी अशा प्रकारचा विचार आम्ही 2009 च्या निवडणुकीच्या वेळी जाहीर केला होता. त्या निवडणुकीच्या वेळी कॉग्रेस पक्षाने निवडणूक जाहीरनामा जाहीर केला होता, त्यामध्ये स्पष्टपणे महाराष्ट्रातील जनतेलाआश्वासित केले होते की, इंदू मिलची संपूर्ण जागा चैत्यभूमीला देण्याच्या संदर्भात आमचे सरकार निश्चितपणे प्रयत्न करेल व तशा प्रकारचे पाऊले उचलेल. त्यावेळेचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री.अशोकराव चव्हाण यांनी सुध्दा यासाठी दिल्लीला जाऊन प्रयत्न केले होते. परतु त्यावेळी स्मारकासाठी किती जागा द्यावी, कशा पध्दतीने ती जागा उपलब्ध करुन द्यावी या बाबतीत कोणी स्पष्ट भूमिका मांडत नव्हते....

यानंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे.....

वेगवेगळ्या प्रकारची भूमिका होती. शेवटी जागा हस्तांतरित करण्याबाबत असलेल्या अडचणी कशा दूर करायच्या, जागा हस्तांतरित करीत असताना ती पूर्णपणे हस्तांतरित करता येईल का अशा अनेक शासकीय स्तरावरील तांत्रिक अडचणी होत्या. या निमित्ताने शासनाने एक समिती स्थापन केली होती. श्रेय घेण्याचा कोणताही हेतू नव्हता. परंतु पडद्यामागे राहून ज्यांनी आपली भूमिका वठविली त्यांचा जर उल्लेख केला नाही तर ते योग्य होणार नाही. फक्त तुम्ही आम्ही काय केले एवढ्यापुरती मर्यादित चर्चा होऊ नये. ज्यांचा संबंध आला त्यांचा उल्लेख केला म्हणजे श्रेय घेणे असा होत नाही.

सभापती महोदय, या प्रश्नाबाबत डॉ.भालचंद्र मुणगेकर यांची समिती 2009 मध्ये स्थापन केलेली होती. या समितीवर राज्यातील प्रमुख नेत्यांची देखील नेमणूक केलेली होती. इंदू मिलची 12.5 एकर जागा स्मारकासाठी देण्याबाबत कोणत्या अडचणी आहेत, त्या कशा दूर करता येतील याचा अभ्यास करुन समितीने सहा महिन्यात अहवाल द्यावा असे सुचविलेले होते. डॉ.मुणगेकर समितीने सहा महिन्यात शासनाला अहवाल सादर केला. 6 डिसेंबरला निर्णय होण्यापूर्वीच्या सहा महिन्याच्या काळात कोणीही आंदोलन केले नव्हते. त्यापूर्वीच्या काळात जरुर आंदोलन करण्यात आले होते. केवळ जनतेचा रेटा पुढे आल्यानंतरच शासनाकडून निर्णय घेतला जातो असा नेहमीचा अनुभव आहे. परंतु मला याठिकाणी सांगितले पाहिजे की, सहा महिन्यापूर्वी पत्रकार परिषद घेऊन इंदू मिलची जागा कोणत्याही हॉटेल व्यावसायिकांना न देता संपूर्ण 12.5 एकर जागा चैत्यभूमीसाठी द्यायला पाहिजे अशी जाहीर मागणी आम्ही केली होती. श्रेय घेण्याच्या उद्देशाने ही मागणी केलेली नव्हती. ही भूमिका सुरुवातीपासून सामाजिक दृष्टीकोनाची असल्यामुळे सामाजिक समता वर्षामध्ये आम्ही ती जाहीर केली होती.

सभापती महोदय, अखिल भारतीय काँग्रेसचे महाराष्ट्राचे प्रभारी श्री.मोहन प्रकाश यांनी हे वर्ष सामाजिक समता वर्ष घोषित केले होते. त्याचे पहिले कलम इंदू मिलच्या जमिनीच्या संदर्भातील होते. पत्रकार परिषद घेऊन सामाजिक समता वर्षाच्या निमित्ताने आम्ही त्या कलमाचा उल्लेख केलेला होता. 105 विषयाच्या शिदोरी पुस्तिकेमध्ये पहिल्या क्रमांकावर इंदू मिलच्या जागेचा उल्लेख आहे, हे मी सदनाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो. माननीय मुख्यमंत्र्यांनी हा विषय हाती घेतल्यानंतर या विषयावर मार्ग काढला पाहिजे, तत्काळ अनुकूल निर्णय झाला पाहिजे,

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे.....

ही पक्षाची भूमिका आहे आणि जाहिरनाम्यामध्ये याचा उल्लेख केलेला आहे याची त्यांनी केंद्रीय स्तरावर जाणीव करुन दिली. माननीय मुख्यमंत्र्यांनी या प्रश्नाबाबत माननीय पंतप्रधानांशी चर्चा केली. त्यासाठी त्यांनी दिल्लीला सर्वपक्षीय शिष्टमंडळ नेले होते. श्रेय घेण्याचा विषय असता तर हा प्रश्न केवळ भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षानेच हाताळला असता आणि माननीय पंतप्रधानांची भेट घेऊन सांगितले असते की, आपल्या पक्षाला या निर्णयाचे श्रेय घ्यायचे आहे.

नंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे....

माननीय पंतप्रधानांबरोबर आम्ही सर्व पक्षाच्या प्रमुखांना बरोबर घेऊन चर्चा घडवून आणली. यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, आमच्या पक्षाच्या नेत्या माननीय सोनिया गांधींची माननीय मुख्यमंत्री तसेच आम्ही इतर मंडळींनी भेट घेतली व जागेच्या संदर्भात त्यांना माहिती दिली. त्यांनी पहिल्यांदा विचारले की, या कामासाठी अगोदर किती जागा आहे व आता किती जागा मिळेल, अडचणी काय काय आहेत त्या समजून घेतल्या तसेच त्यांनी या विषयाच्या संदर्भात टेक्सटाईल मिनिस्टर श्री. आंनद शर्मा यांच्या बरोबर फोनवरुन चर्चा केली. त्यामुळे या ठिकाणी आमच्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी यांचा उल्लेख करणे क्रमप्राप्त आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, काही दिवसानंतर इंदू मिलच्या जागेसंदर्भात जास्त अडचणी आल्या त्यावेळेस माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय राहूल गांधी, माननीय पंतप्रधान तसेच अखिल भारतीय कॉग्रेस कमिटीचे माननीय प्रभारी श्री. मोहन प्रकाश यांच्या बरोबर चर्चा केली. हे काम आपल्याला कोणत्याही परिस्थितीत करावयाचे आहे असा निर्णय त्यावेळी झाला व तसे प्रयत्नही झाले. राज्य सरकार कडून केंद्र सरकारकडे ज्या पाठपुरावा करण्याच्या गोष्टी होत्या त्यामध्ये काही अडचणी आल्या होत्या. औद्योगिक विकासाकरिता ही जागा देण्यात आली होती व औद्योगिक आरक्षण उठविण्याचाही प्रश्न यामध्ये उपस्थित झाला होता. सीआरझेडची अधिसूचना दुरुस्त करण्याचाही विषय होता. इंदू मिल आम्ही सुरु करु या कारणासाठी ही मिल ताब्यात घेण्यात आली होती. ज्या कारणासाठी जागा घेतली जाते त्याच कारणासाठी ती वापरावी लागत असते. परंतु त्यामध्ये सुध्दा आपल्याला बदल करावा लागला. यामध्ये ज्या काही अडचणी होत्या त्या सर्व अडचणी दूर कराव्या लागल्या. सर्व तांत्रिक बाबी दूर करण्यासाठी वर्ष दीड वर्षाचा कालावधी लागला. जागा मिळेपर्यंत आम्ही कोणीही स्वस्थ बसलो नव्हतो. माननीय मुख्यमंत्री इंदू मिलच्या संदर्भात अधिकाऱ्यांना सातत्याने दिल्लीला पाठवित होते व त्या ठिकाणी बैठका घेत होते. तांत्रिक बाबी दूर करण्यासाठी सातत्याने बैठका घेतल्या जात होत्या.

सभापती महोदय, महामानवाच्या चैत्यभूमीला जमीन मिळण्याचा जो विषय आहे त्यासंदर्भातील भावना राज्यातील सर्व जनतेच्या तसेच सर्व संघटनांच्या, सर्व पक्षांच्या भावना एकच होत्या. इंदू मिलची जागा तत्काळ ताब्यात घ्या अशा भावना सगळयांनी व्यक्त केल्या होत्या.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे....

या तारखेला जागा ताब्यात मिळाली नाही तर आंदोलन करु, हे करु, ते करु असे जाहीर करण्यात येत होते. जागा मिळण्यासाठी प्रत्येकाने आपापल्या परीने प्रयत्न केले होते यामध्ये काही दुमत असण्याचे कारण नाही असे मला स्वत:ला वाटते.

सभापती महोदय, 6 डिसेंबर पर्यंत जागा ताब्यात मिळणार नाही असे वाटल्यामुळे माननीय मुख्यमंत्री व आम्ही दिल्लीला गेलो. पहिल्यांदा केंद्रीय मंत्री श्री. आंनद शर्मा यांची भेट घेतली. त्या बैठकीमध्ये महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाचे सर्व खासदार मंडळीही बरोबर होती. दुसऱ्या दिवशी माननीय पंतप्रधानांची आम्ही सर्वांनी भेट घेतली व आम्ही सर्वांनी त्यांना आग्रह केला की, इंदू मिलच्या जागेच्या संदर्भातील जीआर चार दिवंसानी काढण्यापेक्षा आज काढला गेला तर 6 डिसेंबरच्या आत इंदू मिलची जागा स्मारकासाठी ताब्यात मिळेल व राज्यातील जनतेमध्ये चांगल्या प्रकारचा संदेश जाईल. शेवटच्या क्षणापर्यंत आम्ही सर्व बाबींची पूर्तता केली व यासंदर्भात लोकसभेत केंद्रीय मंत्री श्री. आनंद शर्मा व राज्यसभेत केंद्रीय मंत्री श्री. राजीव शुक्ला यांनी इंदू मिलची जागा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी देण्याबाबतचे निवेदन केले.

यानंतर श्री. ओटवणेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

त्यामुळे राज्यामध्येच नव्हे तर संपूर्ण देशामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या चैत्यभूमीला अडचणी येत असल्यामुळे सुविधा पुरविता येत नव्हत्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे एक भव्य स्मारक व्हावे असे सर्वांनीच मनामध्ये आणले होते. आंतरराष्ट्रीय दर्जाचे भव्यदिव्य स्मारक व्हावे असे सर्वांना वाटत होते.

आज मुंबई शहरामध्ये पर्यटनाच्या दृष्टीने पाहण्यासारखे काहीच राहिलेले नाही. काही पर्यटक हे फक्त मुंबईच्या नावानेच येतात. आज पर्यंत आपण मुंबई शहरामध्ये कुठलेही पर्यटन स्थळ विकसित केलेले नाही. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक मुंबईत होणार आहे. या स्मारकाची जागा अत्यंत मुख्य अशा ठिकाणी आहे. येथे आपण भव्य स्मारक केले तर पर्यटकांच्या दृष्टीने एक केंद्र देखील होऊ शकेल.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देशातील दीन,दुबळ्यांसाठी एक विचार दिला. समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केला. जगामध्ये असे अनेक देश आहेत की तेथे सुद्धा दीन,दलित, दुबळे आहेत ते एका आशेने, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराने स्वत:च्या देशात न्याय देण्याचा निश्चितपणे प्रयत्न करतील. तेव्हा येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक होईल अशी अपेक्षा आपण सर्वजण मिळून बाळगू या.

मी यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांना देखील धन्यवाद देऊ इच्छितो. या स्मारकासाठी पैसा कमी पडणार नाही असे त्यांनी सांगितले आहे. माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी या स्मारकासाठी पुढाकार घेतला नसता तर हे स्मारक झाले नसते असे मी म्हणणार नाही. परंतु, हे स्मारक होण्यासाठी किती वर्षे लागली असती हे काही सांगता आले नसते. परंतु, त्यांनी यात पुढाकार घेऊन सर्व तांत्रिक बाबी संबंधात केंद्र शासनाला मदत केली, केंद्र शासनाने ज्या ज्या हरकती घेतल्या होत्या त्या संबंधी मदत केली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक होण्यासाठी अनेक वर्षांचा कालावधी लोटला. अनेक ठिकाणी स्मारके होतात हे सर्वांना माहिती आहे. तांत्रिकदृष्ट्या अडचणीची असलेली मुंबईतील मध्यवर्ती ठिकाणाची जागा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे हे काही सोपे काम नाही. येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक झाले पाहिजे ही त्या पाठीमागची भावना होती. ती फार महत्त्वाची होती. हे कधीही सहजासहजी होत नाही. ज्यांच्याकडे विचार आहेत असे लोकच ही भावना पुढे आणू शकतात. ती भावना आमचे मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी पुढे आणली. इंदू मिलच्या जागी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक व्हावे अशी आमची देखील इच्छा आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे...

त्याद्वारे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार सर्वांपर्यंत पोहचू शकतील. या स्मारकाचा फायदा सर्वांना निश्चितपणे होणार आहे. येथे सर्वसंमतीने भव्य स्मारक होईल. येथे सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण व ॲड.जयदेव गायकवाड यांनी सूचना केली की, माननीय मुख्यमंत्री साहेबांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात यावी. ही समिती कोणाच्या अध्यक्षतेखाली गठीत करायची हा विषय महत्त्वाचा नाही. शेवटी सदर समिती ही राज्य शासनाची असेल. त्यावर सदस्यांची नियुक्ती राज्य शासन करेल. हे स्मारक भव्य दिव्य असल्यामुळे प्रचंड प्रमाणावर काम करावे लागणार आहे. सदर स्मारक उभारणे हे सोपे काम नाही. माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले आहे की, पाहिजे तेवढा पैसा या स्मारकासाठी राज्य शासन देईल, हे सर्वात महत्त्वाचे आहे. यामध्ये ज्यांचा ज्यांचा सहभाग लागला त्यांच्या प्रती मी आभार व्यक्त करतो आणि दोन शब्द पूर्ण करतो.

उप सभापती : या प्रस्तावावरील चर्चेची वेळ दुपारी 11.45 वाजेपर्यंत आहे. सभागृहाच्या अनुमतीने मी सभागृहाची वेळ दुपारी 11.55 वाजेपर्यंत वाढवत आहे.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

उप सभापती : आपणास हरकतीचा मुद्दा मांडण्यास मी अनुमती नाकरीत आहे. या प्रस्तावावर सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्यास मिळणार आहे.

श्री.राम पंडागळे : आता शेवटचे भाषण होणार आहे.

उप सभापती : या प्रस्तावावरील सन्माननीय सदस्य ॲड्.आशिष शेलार यांचे शेवटचे भाषण नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी अर्ध विराम घ्यावा. आता सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी भाषणास सुरूवात करावी.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण व अन्य सदस्यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव आणलेला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी आणि त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावातील शेवटच्या ओळीत "इंदू मिलची जागा राज्य शासनाने स्मारकासाठी अधिग्रहण करुन त्यावर आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभे करण्यासाठी प्राधिकरणाची स्थापना व निधीची तरतूद करुन हे स्मारक लवकरात लवकर पूर्ण करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी" असा उल्लेख आहे. म्हणजे सन्माननीय सदस्यांची अपेक्षा अशी आहे की, हे स्मारक लवकरात लवकर व्हावे. या ठिकाणी सर्वच सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणात अशी अपेक्षा व्यक्त केली की, श्रेयासाठी लढाई होऊ नये. आम्हाला या गोष्टीचे समाधान आहे आणि आनंदही आहे. कारण माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या पध्दतीच्या आधारावर कार्यशैली केली त्यामुळे आपण इथपर्यंत येऊन पोहोचलो हे नाकारण्याचे कारण नाही.

सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्या भाषणानंतर मला बोलण्याची संधी मिळेल असे मला वाटले नव्हते. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी त्यांच्या भाषणात आम्ही श्रेयाचे काम कसे केले हे सांगितले, त्यास देखील हरकत असण्याचे काही कारण नाही. ज्यांनी काम केले त्यांनी ते बोलून दाखविले याबद्दल माझ्यासारख्या कार्यकर्त्याच्या मनात काही शंका असण्याचे काही कारण नाही. परंतु ज्या घटनाक्रमांचा उल्लेख येथे झाला ती लढाई आणि घटना पूर्ण झाल्या आहेत काय ? डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक लवकरात लवकर पूर्ण व्हावे अशी अपेक्षा सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी व्यक्त केली आणि तीच भावना या सदनाची देखील आहे. परंतु ही लढाई आणि जमीन अधिग्रहणांपर्यंतची आलेली भूमिका अजून पुढे जाण्याची आवश्यकता आहे. कारण यामध्ये असलेल्या अडचणींचा उल्लेख येथे केला नाही तर ही चर्चा अपूर्ण राहील असे मला वाटते. तेव्हा त्यांनी जे केले ते येथे मांडले. पण हे काम मागील दहा वर्षात का झाले नाही हे विश्लेषण करण्याची ही वेळ नसल्यामुळे कदाचित तो विषय आपण बाजूला ठेवू. परंतु आपणास अजून बऱ्याच गोष्टी करावयाच्या आहेत. अजून बरीच कामे करावयाची आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार

सभापती महोदय, ही चर्चा ऐकण्यासाठी नगर विकास विभागाचे प्रधान सचिव श्री.मनुकुमार श्रीवास्तव उपस्थित आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक लवकर होण्यासाठी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी अनेक गोष्टी तातडीने केलेल्या आहेत ही गोष्ट खरी आहे. परंतु राज्य सरकार आणि एन.टी.सी. यांच्यामध्ये नेमकी काय चर्चा झाली ? हा तांत्रिक मुद्दा आहे याखाली अनेक गोष्टी दाबून ठेवल्या जात आहेत. या गोष्टी महाराष्ट्रातील जनतेसमोर आणल्या नाहीत तर त्याचे होणारे परिणाम वेगळ्या पध्दतीचे असतील. तेव्हा त्या गोष्टी देखील समोर आल्या पाहिजेत ही आमची मागणी आहे.

सभापती महोदय, सन 1974 मध्ये ही मिल डिफंग झाली म्हणून एन.टी.सी.ने ती खाजगी मालकाकडून घेतली. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी सांगितल्याप्रमाणे आता ती जमीन इंडस्ट्रीअल पर्पज सोडून अन्य कारणासाठी वापरावयाची असेल तर त्यास परवानगी मिळण्याची शक्यता फार कमी असते. तेव्हा 2 डिसेंबर 2012 रोजी राज्य सरकारने एमआरटीपी ॲक्ट 154 खाली डायरेक्शन्स काढल्या अशी माझी माहिती आहे. स्मारकासाठी रिझर्व्हेशन बदलून त्याचे झोनिंग रेसिडेन्शील करावे असा राज्य सरकारचा मनोदय आहे आणि ही बाब स्वागतार्ह आहे. असे केल्याशिवाय त्या ठिकाणी स्मारक होऊ शकणार नाही हे ही खरे आहे.

सभापती महोदय, इतके वर्षे एन.टी.सी.शी काय व्यवहार झाला, त्यांच्यामध्ये कोणती चर्चा झाली या सर्व गोष्टींचा येथे ऊहापोह होणे आवश्यक आहे. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी सांगितल्याप्रमाणे आपणास एन.टी.सी.ने ती जागा फुकटात दिलेली नाही. एन.टी.सी.ने सांगितले आहे की, आपणास ती जागा पाहिजे असेल तर आपणास त्या जागेचे रेडीनेकरप्रमाणे पैसे द्यावे लागतील. ज्यावेळी असा प्रकारचा प्रस्ताव समोर आला त्यावेळी राज्य सरकारकडून वेगवेगळ्या गोष्टींचा उल्लेख केला गेला.

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार.....

जी गोष्ट या सदनामध्ये सांगणे आवश्यक आहे, व सभागृहासमोर ती आली पाहिजे या करिता त्या गोष्टीचा मी उल्लेख करणार आहे. एनटीसीचे म्हणणे असे आहे की, मुंबई शहरामध्ये एनटीसीच्या असलेल्या गिरण्यांच्या जमिनीमधून त्यांना आमदनी मिळाली आहे. त्यामुळे इंदू मिलची जमीन राज्य सरकारला फुकटात दिली तर सीएजीसह अन्य ॲथॉरिटी देखील आमच्यावर स्ट्रिक्चर पास करतील अशाप्रकारची भीती त्यांनी व्यक्त केली आहे. आपण राजकारणाचा भाग बाजूला ठेवला तरी लोकसभेपासून राज्यसभेपर्यंत सीएजी बाबत आपण आपले मत स्पष्ट केले आहे. त्यामुळे सीएजीची चिंता अन्य विषयासाठी नसून इंदू मिलची जमीन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी दिल्यामुळे केंद्र सरकारने आणि सीएजीने चिंता व्यक्त केली. त्यावर राज्य शासनाने आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला हे आपल्याला नाकारुन चालणार नाही. त्याहीपुढे मुंबई महानगरपालिकेचे तत्कालीन आयुक्त श्री. सुबोधकुमार यांनी राज्य सरकारमार्फत केंद्र सरकारला सांगण्याचा प्रयत्न केला की, ही जागा इंडस्ट्रीसाठी असून ती फक्त त्याच कारणासाठी वापरता येऊ शकते. त्यामुळे आमच्या लेखी जागा शून्य असल्यामुळे केंद्र सरकारने आणि एनटीसीने आम्हाला ती जागा मोफत द्यावी. सीआरझेडमध्ये टाकण्यात आलेले आरक्षण आपण बदलू शकत नाही व ते बदलण्याची सोय नाही. तरीदेखील एनटीसी त्यांना बधली नाही. महानगरपालिकेच्या आयुक्तांनी उपस्थित केलेल्या प्रश्नानंतर देखील एनटीसीने आपली भूमिका बदलली नाही व ती जागा राज्य शासनाला मोफत देण्याचा निर्णय घेतला नाही.

याठिकाणी आपण कायद्यातील तांत्रिक बाबींचा उल्लेख केला. डीसीआर-58 खाली मिल लँड डेव्हलपमेंट होतात. या डीसीआर-58 मध्ये बदल करुन या जमिनीवरील एफएसआय आणि टीडीआर शहरातील अन्य गिरणीच्या जमिनीमध्ये पसरविण्यात यावा त्यामधून जी आमदनी मिळेल ती आपण केंद्र शासनाला देऊ. त्यामुळे आपण आता तरी आम्हाला जागा द्यावी अशाप्रकारची चर्चा करण्यात आली. सभापती महोदय, एनटीसी त्या निर्णयाला देखील बधले नाही. त्यावर सुध्दा एनटीसीने असे आर्ग्युमेंट केले की, मुंबईमधील ज्या एनटीसीच्या गिरण्यांच्या जागा मुळातच विकण्यात आल्या असल्यामुळे इंदू मिलच्या जागेवरील एफएसआय आणि टीडीआर शहर भागामध्ये द्यावयाचा असेल तर बाहेर एफएसआय आणि टीडीआर विकत घेणारे मर्यादित लोक राहतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार.....

त्यामध्ये मोनोपली होऊ शकते कार्टेज होऊ शकते, पाच ते सहा लोकांनी मिळून कार्टेज केले तर त्यामधून देखील आम्हाला कमी पैसा मिळेल. त्यामुळे शून्य पैशामधून नाही, कमी पैशामधून सुध्दा नाही त्यामुळे डीसीआर-58 ला सुदा एनटीसी बधली नाही.

याठिकाणी सर्वपक्षीय आंदोलनांचा उल्लेख करण्यात आला. त्यामध्ये सर्वश्री आनंदराज आंबेडकर, रामदास आठवले, प्रकाश आंबेडकर यांनी केलेल्या आंदोलनाबाबत एनटीसीचा रवैय्या असा होता की, 6 डिसेंबरला श्री. आनंदराज व अन्य पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन केले त्यावेळी त्यांच्यासमोर एनटीसी बधली नाही तर त्यांनी हायकोर्टामध्ये धाव घेतली. सभापती महोदय, या लढयामध्ये जे जे करावे लागले ते सर्व स्पष्ट झाले पाहिजे. या जमिनीसाठी ज्यांनी आंदोलन केले त्यांच्याविरुध्द एनटीसी कोर्टामध्ये जाऊन त्या ठिकाणी आंदोलनकर्त्यांना एन्क्रोचर संबोधून त्यांना इव्हिक्ट करण्याची मागणी करण्यात आली. ज्यावेळी मी एनटीसीबाबत या ठिकाणी सांगत आहे त्यावेळी तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांनी घेतलेली भूमिका देखील योग्य होती. राज्य शासनाने केंद्र शासनाला आणि हायकोर्टाला प्रतिज्ञापत्र सादर करतांना असे म्हटले की, आंदोलनकर्त्यांना एन्क्रोचर संबोधू नका, ती जागा सुरक्षित करण्यासंबंधीची भूमिका आम्ही घेऊ. परंतु या जागेच्या लढयासाठी झालेल्या आंदोलनाविरुध्द एनटीसी हायकोर्टामध्ये गेली हे सत्य देखील आपल्याला नाकारता येणार नाही.

सभापती महोदय, साडे बारा एकरची जागा 5 लाख 41 हजार स्क्वेअर फूटाचा टीडीआर जनरेट करणार आहे, तो आज 2 हजार स्क्वेअर फूट भावाने बाजारात विकला आणि त्यासंबंधीच्या डीसीआर-58 मध्ये बदल करुन तो विकण्यास खुला करण्यात आला तर त्यामधून 1400 ते 1500 कोटी रुपये आपल्याला मिळतील. तेवढी रक्कम एनटीसी ला दिली जाईल या अटीवरच आपल्याला ही जागा मिळालेली आहे. त्यानंतरच या सदनाची आणि माननीय सदस्यांची असलेली भूमिका परिपूर्ण होईल हे आपल्याला नाकारुन चालणार नाही. सभापती महोदय, श्री.बेंजामीन साहेबाच्या अध्यक्षतेखाली एक प्रशासकीय समिती नेमण्यात आली त्या समितीने एमसीझेडएमचा एक निर्णय करुन पाठविला व त्यामध्ये ही जागा इंडस्ट्रिअल पर्पजसाठी राखीव ठेवू अशाप्रकारचा उल्लेख केला. त्यामुळे टीडीआर बाबत आपल्याला अजून देखील बऱ्याच गोष्टी कराव्या लागणार आहेत. त्यामुळे मी सुरुवातीलाच "दिल्ली अभी दूर है" असे सांगितले आहे. आज आपण सेक्शन 154 खाली डिरेक्शन काढल्यानंतर सुध्दा...

(अपूर्ण-यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : आता या प्रस्तावावरील चर्चा थांबविण्यात येत आहे. सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांचे भाषण अपूर्ण आहे.

आता सभागृहाची बैठक स्थगित होऊन दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक 11.55 वाजता दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

तालिका सभापती : सभागृहाची बैठक दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 1.00 वाजता सुरु होईल. त्यामध्ये प्रश्नोत्तराचा तास आणि त्यानंतर पुढील कामकाज होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.00 ते 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

औचित्याच्या मुद्याबाबत

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती : प्रश्नोत्तराच्या तासानंतर औचित्याचा मुद्दा मांडण्यास आपणास परवानगी देण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

पुण्यातील अनधिकृत बांधकामाबाबत

(१) * ३३९८३ श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले, श्री.दीपकराव साळुंखे, श्री.जयवंतराव जाधव : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर आणि परीसरात सामान्य नागरिकांनी घरे बांधतेवेळी महापालिका प्रशासनाने किंवा पोलिसांनी अनधिकृत घरांबाबत कोणतीच कारवाई केली नाही तथापि माहे ऑक्टोबर २०१२ मध्ये वा त्यादरम्यान सामान्यांच्या बांधकामावर कारवाई करीत आहे, मात्र मोठया बांधकाम व्यावसायिकांवर कारवाई करीत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आजपर्यंत कमिटेड डेव्हलपमेंट च्या खाली किती बांधकामे नियमित करण्यात आली आहेत,

(३) असल्यास, किती बांधकामे नियमित केली आहेत,

(४) तसेच राज्य सरकारच्या आदेशाप्रमाणे पुणे शहरात होत असलेल्या अनधिकृत पध्दतीचे बांधकामाबाबत जबाबदार असलेले पुणे महानगरपालिकेचे आयुक्त व नगर अभियंता यांच्यावर कारवाई केली आहे काय,

(५) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (१) हे खरे नाही.

(२) व (३) कमिटेड डेव्हलपमेंट हा विकास नियंत्रण नियमाखालील कोणताही नियम नाही. त्यामुळे याखाली बांधकामे नियमित करण्यात येत नाहीत.

(४) व (५) पुणे महानगरपालिकेने अनधिकृत बांधकामावर उपलब्ध यंत्रसामुग्री व मनुष्य बळाने सातत्याने कारवाया केल्या असून, त्या चालू आहेत. त्यामुळे ऑक्टोबर, २०१२ मध्ये फक्त सामान्यांच्या बांधकामावर कारवाया केल्या असे नसून, प्राधान्यक्रमाने सर्वच प्रकारच्या अनधिकृत बांधकामावर कारवाया चालू आहेत. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. अनिल भोसले : सभापती महोदय, प्रश्नाला दिलेल्या छापील उत्तरामध्ये बरीचशी चुकीची माहिती दिलेली आहे. पुणे शहरातील राज्य शासनाच्या अनेक जागा लिजने दिलेल्या आहेत. कलेक्टर मान्य असे ते लेआऊट आहेत. प्रत्येक प्लॉटच्या ठिकाणी बांधकाम करताना जिल्हाधिका-यांची परवानगी घेणे आवश्यक असते. शिवाजी को-ऑप. हौसिंग सोसायटी आणि अशोक को-ऑप. हौसिंग सोसायटीने बांधकाम करताना जिल्हाधिका-यांची परवानगी घेतलेली नाही. त्यांनी महानगरपालिकेची परवानगी घेतलेली आहे. तेव्हा अशा प्रकारची सर्व अनधिकृत बांधकामे थांबवून त्याची चौकशी करण्यात येणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी पुणे शहरातील अनधिकृत बांधकामांच्या संदर्भात मूळ प्रश्न विचारलेला आहे. आता सन्माननीय सदस्यांनी एका स्पेसिफिक बांधकामाच्या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे. या संदर्भात नेमकी वस्तुस्थिती काय आहे हे समजून घ्यावे लागेल. ते समजून घेतल्या नंतर सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे कारवाई करणे उचित होईल.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33983...

श्री. मोहन जोशी : महाराष्ट्र राज्य शासनाने सन 2012मध्ये प्रांतिक महानगरपालिका कायद्यामधील कलम 260 मध्ये सुधारणा करुन खालच्या कोर्टाचे अधिकार काढून ते हायकोर्टाला देऊन निर्देशित अधिका-याची नेमणूक केली. ही सुधारणा केल्यानंतर पुणे महानगरपालिका क्षेत्रात एकूण किती अनधिकृत बांधकामे पाडण्यात आली ? ज्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेने कलम 260 प्रमाणे अनधिकृत बांधकामाच्या बाबतीत कारवाई केली त्याप्रमाणे राज्यातील किती महानगरपालिकांनी अनधिकृत बांधकामाबाबत कारवाई केलेली आहे ? माझा तिसरा प्रश्न असा आहे की कलम 260 मधील सुधारणेमुळे महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामांना चाप बसेल, परंतु पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्राबाहेरील गावे उद्या पुणे महानगरपालिकेमध्ये येणार असून या गावातील अनधिकृत बांधकामांच्या बाबतीत कारवाई करण्यासाठी जमीन महसूल संहितेमध्ये सुधारणा केली जाईल काय ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी एकूण चार प्रश्न विचारले. या विधिमंडळाने अनधिकृत बांधकामांना चाप बसण्यासाठी ऐतिहासिक असा कायदा केलेला आहे. दिनांक 13 मार्च 2012 रोजी कलम 260मध्ये सुधारणा करुन हा अधिनियम अस्तित्वात आला. या कायद्याची अंमलबजावणी आजतागायत फक्त पुणे आणि पिंपरी-चिंचवड या दोन महानगरपालिकामध्ये करण्यात आली. उर्वरित महानगरपालिकांमध्ये या कायद्याची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शासनाच्या माध्यमातून संबंधितांना आदेश देता येतील. हा कायदा केवळ महानगरपालिका क्षेत्रासाठीच नाही तर सर्व नगरपालिका आणि नगरविभागांना लागू केलेला आहे. महानगरपालिकेच्या हद्दीबाहेर जी अनधिकृत बांधकामे आहेत त्यासाठी क्षेत्रीय विकास प्राधिकरणाचा कायदा विधिमंडळाने पास केलेला आहे. या कायद्याची अंमलबजावणी काही कारणामुळे होऊ शकली नाही.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीकरित प्रत / शुद्धीकरणासाठी नाही

ता.प्र.क्र.33983...

श्री.भास्कर जाधव...

त्या कायद्याची अंमलबजावणी का झाली नाही, त्याचे कारण थोडेसे वेगळे आहे. परंतु त्या कायद्याची अंमलबजावणी आम्ही करु शकलो तर निश्चितपणे त्या कायद्याची आम्हाला प्रभावीपणे अंमलबजावणी करता येईल.

हा कायदा अस्तित्वात आल्यानंतर पुणे महानगपालिकेने आतापर्यंत किती अनधिकृत बांधकामावर कारवाई केली आहे असा सन्माननीय सदस्यांनी शेवटचा प्रश्न विचारलेला आहे, त्याबाबतीत सांगू इच्छितो की, 2 हजार 50 चौरस फूट बांधकाम गेल्या पाच वर्षामध्ये पाडता आले. परंतु हा कायदा अस्तित्वात आल्यामुळे एका वर्षात पुणे महानगरपालिकेने 13 लाख 535 चौरस फूट अनधिकृत बांधकामे निष्कासित केलेली आहेत.

श्रीमती दिप्ती चवधरी : राज्य शासनाने राजपत्रात प्रसिध्द केल्यानुसार 28 गावे पुणे महानगरपालिका क्षेत्रात समाविष्ट करण्याचा निर्णय घेतलेला आहे. पुणे महानगरपालिकेकडे अनधिकृत बांधकामे पाडणारी यंत्रणा अतिशय सक्षम आहे. परंतु या 28 गावातील जवळ जवळ 6 हजार अनधिकृत बांधकामे समाविष्ट झालेली आहेत. त्याचा ताण या यंत्रणेवर निश्चितपणे येणार आहे. या 6 हजार अनधिकृत बांधकामाबाबत शासनाची भूमिका काय आहे?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, यात तीन गोष्टींचा समावेश आहे. अनधिकृत बांधकामे ही डी.सी.आर.प्रमाणे आहेत, त्या बांधकामाबाबत फक्त परवानगी घेतली नाही तर ती रेग्युलाईज्ड करता येतात काय ही गोष्ट पहावी लागते. सदरची अनधिकृत बांधकामे शासकीय जमिनीवर आहेत काय ती देखील माहिती पहावी लागते. त्यानंतर अशा प्रकारच्या अनधिकृत बांधकामाची व्याख्या करावी लागते. डी.सी.रुलच्या अंतर्गत निकषात बसणारी जी अनधिकृत बांधकामे असतात ती रेग्युलाईज्ड केली जातात. जी अनधिकृत बांधकामे रेग्युलाईज्ड करता येत नाहीत, ती निष्कासित करण्याची कारवाई केली जाते. त्यासाठीच हा कायदा केलेला आहे. त्याच बरोबर पोलीस संरक्षण मिळत नाही असे सांगितले जाते. आता महानगरपालिकेकरिता सुध्दा स्वतंत्र पोलीस कर्मचाऱ्यांची पदे पोलीस खात्या अंतर्गत तयार करण्याची कायद्यामध्ये तरतूद करण्यात आलेली आहे.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण...

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, फक्त पुणे शहरातच नव्हे तर मुंबई तसेच अनेक शहरांमध्ये अनधिकृत बांधकामे खुलेआम होत असतात. पोलीस दल, संबंधित विभागाचे अधिकारी वॉर्ड अधिकारी यांना एकत्रिक करुन ती अनधिकृत बांधकामे तोडली जातात. महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबत कनिष्ठ अभियंता, वॉर्ड ऑफिसर, पोलीस अधिकारी, स्थानिक नगरसेवक यांना पूर्णपणे माहिती असते. ही सर्व अनधिकृत बांधकामे संबंधित अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचारामुळे होतात. परंतु त्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात येत नाही. यापुढच्या काळात या अधिकाऱ्यांविरुध्द कोणत्या प्रकारची कारवाई शासनाच्या माध्यमातून केली जाणार आहे ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या प्रश्नाचे मी पूर्वीच उत्तर दिलेले आहे. मी पुन्हा सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, दिनांक 13 मार्च, 2012 रोजीचा जी.आर.आहे. 260 कलमामध्ये नवीन अमेडमेंट केलेली आहे. ज्या वॉर्ड अधिकाऱ्याच्या वॉर्डमध्ये अशा प्रकारचे अनधिकृत बांधकाम झाले असेल तो वॉर्ड अधिकारी आणि त्या विभागातील पोलीस अधिकारी यांना ही बाब लक्षात आणून दिल्यानंतरही त्यांनी या अनुषंगाने कारवाई केली नाही तर त्यांना जबाबदार धरण्याची तरतूद पूर्वीच्या कायद्यात नव्हती. आता जबाबदारी फिक्स करण्याची तरतूद सदर कायद्यामध्ये करण्यात आलेली आहे. या कायद्यान्वये पुणे महानगरपालिकेने एका अधिकाऱ्याला सस्पेंड केलेले आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : एकूण किती अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे याची माहिती मला पूर्णपणे मिळालेली नाही. लाखो अनधिकृत बांधकामे होतात आणि फक्त एका अधिकाऱ्याला सस्पेंड केलेले आहे हे बरोबर नाही.

श्री. भास्कर जाधव : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, पूर्वीच्या कायद्यात संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची तरतूद नव्हती. हा कायदा आता लागू झालेला असून तो कायदा दोन महानगरपालिकेने लागू केलेला आहे. त्या कायद्यातील तरतुदीप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु होईल.

.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शरद रणपिसे : सभापती महोदय, सन्माननीय राज्यमंत्र्यांनी असे सांगितले की, पोलीस दल पुरविण्याचा आम्ही कायदा केला आहे. परंतु प्रत्यक्ष यासंबंधीची अंमलबजावणी अजून सुरु झालेली नाही. महापालिका पैसे देत असताना सुध्दा पोलीस विभाग आपले दल देऊ शकत नाही पोलीस दल देण्याची कार्यवाही कधी पासून सुरु होणार आहे? बेकायदेशीर बांधकामे बांधली जातात. गोरगरिबांना, मध्यमवर्गीयांना घरे मिळत नाहीत. शहरांमध्ये अफोर्डेबल हाऊसिंग नाही, यूएलसी कायद्याची विल्हेवाट वेगळया पध्दतीने लागली आहे. इडब्ल्यूएसमध्ये घरे होत नाहीत. यूएलसी आणि इडब्ल्यूएसमध्ये शासनाने किती घरांची निर्मिती केलेली आहे वा करणार आहात?

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांच्या पोलीस दल पुरविण्या विषयीचा पहिला प्रश्न आहे. त्या बाबतीत सांगू इच्छितो की, पोलीस दलातील पोलीस आहेत, यात पोलिसांचे प्राधान्य ठरलेले आहे. त्यामुळे अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यासाठी पोलीस दल उपलब्ध होत नाही. अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यासाठी जेवढे पोलीस पाहिजे, त्यासंदर्भात संबंधित महानगरपालिकेने तिमाही ॲडव्हान्स भरावा. तेवढी पोलिसांची नवीन पदे निर्माण केली जातील अशीही कायद्यात तरतूद करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दुसरा प्रश्न पोलीस दल स्थापन करण्याबाबत विचारला आहे. या संदर्भातील निर्णय त्या त्या महानगरपालिकेने घ्यायचा आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अनधिकृत बांधकामाची व्याख्या तपासून घ्यावी लागते असे सांगितले. अनधिकृत बांधकामाबाबत दोन-तीन प्रकार दिसून येतात. 1998 साली 28 गावांचा पुणे महानगरपालिकेमध्ये अंतर्भाव करण्यात आला आणि काही काळानंतर या निर्णयाला स्थगिती देण्यात आली. नंतर पुन्हा पूर्वीचाच निर्णय कायम करण्यात आला. मध्यंतरीच्या काळात ज्यांच्या स्वत:च्या एक ते दीड गुंठा जमिनी होत्या, त्यांनी त्या जमिनीवर घरे बांधली. इतर अवैध बांधकामांना संरक्षण मिळणार का असा प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेला असला तरी तो प्रकार संघटित गुन्हेगारीचा आहे. परंतु शहराला लागून असलेल्या स्वत:च्या जमिनीवर ज्यांनी बांधकाम केले आहे त्या घरांचा समावेश आता महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये झालेला आहे. अशी बांधकामे अनधिकृत न समजता नियमित करण्याबाबत शासन सकारात्मक निर्णय घेणार आहे काय?

श्री.भास्कर जाधव : ही गावे आता महानगरपालिकेच्या हद्दीत समाविष्ट झाली असली तरी पूर्वी तेथे ग्रामपंचायत होती. ग्रामपंचायतीला जिल्हा परिषद ॲक्ट लागू होतो. रितसर परवानगी घेऊन बांधकामे केली असतील तर अशा बांधकामांना अनधिकृत म्हणता येणार नाही. त्यानुसार शासनाला विचार करावा लागेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नागपूर येथील मिहान प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांबाबत

(२) * ३४५५४ डॉ.नीलम गोऱ्हे : तारांकित प्रश्न क्रमांक २३१९९ ला दिनांक १४ डिसेंबर, २०११ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मिहान प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना देऊ केलेल्या १२.५० टक्के जागेसाठी राज्य शासनाने लावण्यात आलेले विकास शुल्क कमी करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) अद्याप निर्णय झाला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, नागपूर शहरामध्ये विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरु असताना नागपूर शहर आणि संपूर्ण महाराष्ट्रासाठी भूषण असलेल्या मिहान प्रकल्पामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना शासनाने कोणता न्याय दिला आहे? किती प्रकल्पग्रस्तांना १२.५ टक्के भूखंड दिले गेले, त्याचा लाभ सर्व प्रकल्पग्रस्तांना मिळाला आहे काय? मिहान प्रकल्पाच्या प्रगतीला विलंब लागण्याची कारणे काय आहेत?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मिहान प्रकल्पांतर्गत प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ मधील तरतुदीनुसार १२.५ टक्के विकसित भूखंड किंवा सानुग्रह अनुदान देण्याबाबत दिनांक ७.१०.२०११ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. काही लोकप्रतिनिधींच्या विनंतीनुसार दिनांक ३.३.२०१२ रोजी सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. या सुधारित निर्णयानुसार प्रकल्पग्रस्तांना १२.५ टक्के विकसित जमीन किंवा सानुग्रह अनुदान यापैकी एका विकल्पाची निवड करता येते. एकूण २६४३ प्रकल्पबाधित आहेत. दिनांक २०.३.२०१२ रोजी जाहीर प्रकटन करण्यात आले व प्रकल्पबाधितांना कोणता विकल्प हवा आहे हे कळविण्यासाठी दोन महिन्यांचा कालावधी देण्यात आला होता. त्याप्रमाणे जाहीर प्रकटनानंतर १३०४ विकल्प प्राप्त झाले. १३१२ अप्राप्त असून ३६६ लोकांनी विकसित जमिनीसाठी विकल्प दिलेला आहे व ९३८ लोकांनी सानुग्रह अनुदानासाठी विकल्प दिलेला आहे. यासाठी शासनाकडून आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.: 34554.....

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, मिहान प्रकल्पाच्या संदर्भात संपूर्ण महाराष्ट्रात गांभीर्याने चर्चा झालेली आहे. मिहान प्रकल्पामध्ये एसईझेडची तरतूद देखील करण्यात आली होती. 2086 हेक्टर भूखंडावर हा मल्टी पर्पज प्रकल्प होणार आहे. या संदर्भात माझा प्रश्न असा आहे की,मिहान प्रकल्पामध्ये 614 हेक्टर जमीन ही सर्व्हीस सेक्टर युनीट करिता प्रपोज करण्यात आलेली आहेत. एसईझेडला काही फायनान्शिअल इन्सेंटीव्ह देण्याची भूमिका राज्य शासनाने घेतलेली आहे काय, व त्या संदर्भात भूमिका घेतली असेल तर ती कोणती आहे ? मिहानमघील प्रकल्पांमध्ये सॉफ्ट टॅक्सेशन पॉलिसी शासनाने प्रपोज केलेली आहे काय, या पॉलिसीमध्ये नेमके काय म्हटले आहे ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मिहान प्रकल्प महाराष्ट्राच्या दृष्टीने विशेषत: विदर्भ व नागपूरच्या दृष्टीने प्रतिष्ठेचा आहे. हा प्रकल्प गेल्या काही वर्षापासून काही ना काही अडचणीमध्ये अडकला होता. परंतु गेल्या दोन वर्षापासून मिहान प्रकल्पाला चांगली चालना मिळालेली आहे. आपल्या सर्वांना माहीत आहे की, या प्रकल्पामध्ये दोन प्रमुख भाग आहेत. येथे सध्या अस्तित्वात असलेले नागपूर विमानतळ आहे. तेथे खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय विमानतळ करावयाचे आहे व या विमानतळाला दोन धावपट्टया करावयाच्या आहेत. या विमानतळाच्या शेजारी मेन्टेनन्स, रिपेअरिंग आणि ओव्हरऑल ॲक्टीव्हीटी करण्याचा राज्य शासनाचा मानस होता. तसेच दुसरा भाग मिहान प्रकल्पामध्ये विशेष आर्थिक क्षेत्र विकसित करण्याचा आहे. यासाठी जमीन अधिग्रहीत करण्यात आलेली आहे. या प्रकल्पातील 135 हेक्टर जमीन ही नेमकी दुसऱ्या धावपट्टीवर असून ती जमीन अधिग्रहीत करण्याचे काम सुरु आहे. या संदर्भात कोणकोणते पर्याय देण्यात आलेले आहेत, याची माहिती माननीय राज्य मंत्री महोदयांनी आताच सभागृहाला दिलेली आहे.

आपल्या सर्वांना माहिती आहे की, केंद्र सरकारने विशेष आर्थिक क्षेत्राची कल्पना मांडली होती. ही संकल्पना प्रभावीपणे इतर राष्ट्रांनीही राबविली होती. चीनने ही योजना चांगल्या प्रकारे राबवलेली आहे. एसईझेडमुळे मोठया प्रमाणात परकीय गुंतवणूक व्हावी, निर्यात व्हावी व त्यातून परकीय चलन मिळावे, असा याचा मुख्य उद्देश होता. परंतु मध्यंतरीच्या काळात विशेष आर्थिक

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

क्षेत्रातील जमीन ही परकीय जमीन आहे असे मानून त्या क्षेत्राला कमीत कमी नियम लागू होतील, असे धोरण स्वीकारण्यात आले होते. विशेषत: कर संबंधीचे नियम कमीत कमी लागू होतील, अशी या बाबतीत कल्पना होती.

सभापती महोदय, विशेष आर्थिक क्षेत्राकरिता महाराष्ट्र राज्यात सर्वात जास्त अर्ज आले व ते मंजूरही झाले. परंतु मध्यंतरीच्या काळात केंद्र सरकारने या संदर्भात विचार बदलला. यानंतर विशेष आर्थिक क्षेत्राला मॅट लागू केला. देशातील इतर कंपन्याना डिव्हीडंड डिस्ट्रीब्यूशन टॅक्स द्यावा लागतो. मात्र एसईझेड मधील कंपन्यांना हा टॅक्स लागू होणार नाही, असे सुरुवातीला धोरण निश्चित करण्यात आले होते. या नंतर हे धोरण देखील बदलले गेले. एसईझेड मधील कंपन्यांना देखील डीव्हीडंड डीस्ट्रीब्यूशन टॅक्स लावण्यात आला. यामुळे एसईझेडचे सर्व स्वरुपच आता पालटून गेले. आम्हाला एसईझेड मध्ये काम करावयाचे नाही, या संदर्भात केंद्र सरकारला अर्ज करणार आहोत असे आम्हाला अनेक लोकांनी सांगितले. परंतु मी आपणाला सांगू इच्छितो की, नागपूर येथील मिहान प्रकल्प हा वेगळा एसईझेड आहे. हा एसईझेड राज्य सरकारने विकसित केलेला असून तो खाजगी एसईझेड नाही.

गेल्या पाच - सहा वर्षापासून मिहान प्रकल्पाचे काम थंड पडले होते. त्याचा विकास होईल की, नाही याबाबत शंका होती. परंतु आता राज्य सरकारने ॲग्रेसिव्ह मार्केटींगचे धोरण अवलंबल्यामुळे मिहान प्रकल्पामध्ये इतर अनेक मोठ - मोठे प्रकल्प येऊ लागले आहेत. इन्फोसिस ही देशातील सर्वात मोठी सॉफ्टवेअर कंपनी आहे. या कंपनीने मिहान प्रकल्पामध्ये भूमिपूजन केले असून त्यांच्या प्रकल्पाची सर्व रुपरेषा आम्हाला दिलेली आहे. त्यांच्या कंपनीमध्ये जवळपास 15 हजार लोक काम करतील, असे त्यांचे म्हणणे आहे. जगातील सर्वात मोठी सॉफ्टवेअर कंपनी टीसीएस असून या कंपनीने देखील मिहान प्रकल्पात येण्याचा निर्णय घेतला आहे. या कपंनीचेही काम सुरु झाले असून तेथे हजारो कामगार काम करु शकणार आहेत. बोईंग कंपनीच्या एमआरओचे देखील काम सुरु आहे. पुढील एप्रिल महिन्यापर्यंत बोईंग कंपनीचे काम सुरु होईल, असे शासनाला सांगण्यात आलेले आहे. या ठिकाणी काही कंपन्यांचे

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.....

काम सुरु झालेले आहे. तसेच तेथे विजेची व्यवस्था देखील करुन देण्यात आलेली आहे. मिहान मधील कंपन्याना इतर सवलती देण्यात आलेल्या नाहीत परंतु त्यांना जमिनीच्या किंमतीमध्ये सवलती देण्यात आलेल्या आहेत.

मी आपणास सांगू इच्छितो की, या ठिकाणचे एसईझेडचे क्षेत्र अतिशय चांगल्या प्रकारे विकसित झालेले आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

त्याला आता खूप मागणी येत आहे. जमीन अधिग्रहणाचा विषय संपल्यानंतर मी रोड शो करण्याचा देखील विचार करीत आहे. जमीन अधिगृहीत झाल्यानंतर, दुसरी धावपट्टी होण्याच्या आधी बोईंगकरिता छोटासा रन-वे आवश्यक आहे. त्या रन-वे चे कंत्राट देण्यात आले आहे. तसेच आता छोटासा टॅक्सी-वे देखील तयार होत आहे. एकंदरीत या प्रकल्पाची प्रगती चांगली चालली आहे. यामध्ये जी काही अडचण येईल ती सोडविण्यास राज्य सरकार कटिबद्ध आहे. मला विश्वास आहे की, हा प्रतिष्ठेचा SEZ भविष्यात चांगल्या प्रकारे काम करेल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, जैताळा, शिवणगाव परिसरातील शेतकऱ्यांची घरे मिहान प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली आहेत. सदर घरे प्रकल्पातून वगळण्यात आली आहेत. अजूनही डी-नोटिफाईड आदेश काढण्यात आलेला नाही. सिडको फेज-2 मध्ये संपादित केलेल्या जमिनी ह्या मिहान प्रकल्पातून वगळण्यात आलेल्या आहेत. त्याचाही सुधारित आदेश अद्यापि शासनाने काढलेला नाही हे खरे आहे काय ? 1304 जणांचे निर्णय झाले. 1312 जणांचे निर्णय अजूनही झालेले नाहीत. त्याबद्दल शासनाचा निर्णय काय आहे ? 9 महिन्यापूर्वी निर्णय झाले त्याची प्रगती कुठ पर्यंत आली आहे ?

प्रा.फौजिया खान : सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला आहे त्यासंबंधी मी असे सांगू इच्छिते की, 1312 लोकांचा विकल्प अद्याप प्राप्त झालेला नाही. जी.आर.मध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांना सानुग्रह अनुदान देण्यात येणार आहे. त्यांना दुसरा विकल्प घेता येत नाही. त्यांना सानुग्रह अनुदानाचे वाटप करण्यात येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, जैताळासंबंधी मंत्री महोदयांनी काहीच उत्तर दिलेले नाही.

सभापती : सदर प्रश्न हा अत्यंत महत्वाचा असल्यामुळे माननीय राज्य मंत्री महोदयांनी आपल्या दालनात सन्माननीय सदस्यांना बोलावून चर्चा करावी.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के जमीन दिली जाणार आहे. ती जमीन या प्रकल्पा पासून किती दूरवर दिली जाणार आहे किंवा किती जवळ दिली जाणार आहे, यासंबंधी माननीय मंत्री महोदय, खुलासा करतील काय, प्रकल्पग्रस्ताना सानुग्रह अनुदान दिले जाणार त्याचा दर सिडको प्रमाणे राहणार आहे काय ? ...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सेझ ला लागूनच ही जमीन आहे. सर्व शेतकऱ्यांना सिडकोप्रमाणेच दर आकारून सानुग्रह अनुदान देण्यात येणार आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी आताच या प्रश्नाला सविस्तर उत्तर दिले आहे. नागपूरच्या दृष्टीने मिहान प्रकल्पाचा प्रश्न हा सर्वांच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. आताच सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी सॉफ्ट टॅक्सेशन पॉलिसीचा उल्लेख केला आहे. तेव्हा सॉफ्ट टॅक्सेशन पॉलिसी नेमकी कशी असणार आहे ? यासंबंधीचे शासनाचे धोरण ठरले आहे काय ? यासंबंधातील माहिती जाणून घेण्यास आम्ही उत्सूक आहोत.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मिहानमध्ये जे उद्योग येतील त्यावर बहुतेक कर केंद्र सरकारचे असतील. राज्य सरकारची फक्त युझर चार्जेस घेण्याची कल्पना आहे. त्यामध्ये काही अडचण नाही. मी स्वत: केंद्रीय उद्योग मंत्र्यांना विनंती केली आहे की, सेझ हा विषय महत्त्वाचा आहे. आपण कर विषयक बदल केले आहेत त्याचा पुनर्विचार करावा. त्यामुळे कर विषयक सवलती किंवा नियम आहेत ते केंद्र सरकार लागू करेल.

.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पुणे शहरात जवाहरलाल नेहरु योजनेअंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध प्रकल्पांच्या कामाबाबत

(3) * 33743 श्री.मोहन जोशी, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पुणे शहरात जवाहरलाल नेहरु योजनेअंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध प्रकल्पांची कामे 50 टक्के अपूर्ण असल्याचे माहे ऑगस्ट, 2012 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, 50 टक्के निधी खर्च न झाल्यास दुसऱ्या टप्प्यातील निधी दिला जाणार नाही असे केंद्र शासनाने स्पष्ट आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, 50 टक्के कामे अपूर्ण राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(4) असल्यास, याबाबतीत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे ?

श्री.भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (1) हे खरे नाही. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत नागरी पायाभूत सुविधा व प्रशासन (UIG) या घटकांतर्गत पुणे महानगरपालिकेकरिता मंजूर 11 प्रकल्पांपैकी 4 प्रकल्प पूर्ण झाले असून उर्वरित 7 प्रकल्पांची प्रगती 70 ते 85 टक्क्यांच्या दरम्यान आहे.

(2) हे खरे नाही.

(3) व (4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, केंद्र सरकारने देशातील सर्व महानगरपालिका क्षेत्रासाठी अतिशय क्रांतीकारक निर्णय घेतला आहे. जेएनएनयुआरएम च्या माध्यमातून हजारो कोटी रूपये या देशातील महानगरपालिकांना खर्च करण्यासाठी दिले आहेत. यासाठी अनेक राज्यातील काही शहरांतील महानगरपालिकांची निवड करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33743...

श्री.मोहन जोशी...

पुणे हे देशातील असे एक शहर आहे की, ज्या शहराला या योजनेंतर्गत केंद्र सरकारकडून सर्वाधिक निधी मिळालेला आहे. या संदर्भात माझे तीन प्रश्न आहेत.

सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न आहे की, जेएनएनयुआरएम या योजनेंतर्गत 2204 कोटी रुपये इतका निधी प्राप्त झाला, त्यापैकी किती निधी खर्च झाला ? पुणे शहरात एकूण 11 प्रकल्प मंजूर झाले आहेत. लेखी उत्तरात नमूद करण्यात आले आहे की, चार प्रकल्पांची कामे पूर्ण झालेली आहेत. उर्वरित सात प्रकल्पांची कामे केव्हा पूर्ण होणार आहेत ? माझा दुसरा प्रश्न आहे की, जेएनएनयुआरएमच्या दुसऱ्या टप्प्यासाठी पुणे महानगरपालिकेने किती हजार कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर केलेला आहे आणि त्यामध्ये राज्य शासन आपला 20 टक्के हिस्सा देण्यास तयार आहे काय ? माझा तिसरा प्रश्न आहे की, या योजनेंतर्गत घेण्यात येणाऱ्या प्रकल्पाची कामे का रखडली याचा शोध राज्य सरकारने कधीही घेतला नाही. ज्या ठिकाणी प्रकल्प करावयाचा आहे ती जागा राज्य शासनाची असल्यामुळे आणि राज्य शासनाने ती जागा महानगरपालिकेकडे हस्तांतरित न केल्यामुळे काही प्रकल्पांची कामे रखडली आहेत. त्यामुळे प्रकल्पाच्या किंमती वाढलेल्या आहेत. तेव्हा या सर्व गोष्टीस कोण जबाबदार आहे ?

सभापती महोदय, मी या ठिकाणी एक उदाहरण देतो. एका प्रकल्पामध्ये येरवडा तुरुंगातील जागा उपलब्ध करुन द्यावयाची आहे. या प्रकरणी नगर विकास विभाग फक्त कामाचा प्रोग्रेस विचारण्याचे काम करीत आहे. खरे म्हणजे नगर विकास विभागाने स्वत: पुढाकार घेऊन समन्वयाची भूमिका पार पाडावयास पाहिजे. गृह विभाग देखील राज्य शासनाचा एक भाग आहे. माझा प्रश्न आहे की, जी कामे प्रलंबित आहेत त्या संबंधी चौकशी करण्यासाठी एखादी एजन्सी नेमण्यात येईल काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो पहिला प्रश्न विचारला त्यामध्ये मी थोडी दुरुस्ती करतो. सन्माननीय सदस्यांनी देशातील सर्व महानगरपलिका असा उल्लेख केला. परंतु तशी वस्तुस्थिती नाही. देशातील 63 शहरांमध्ये ही योजना लागू झाली. त्यांनी सांगितले की, आपणास रुपये दोन हजार कोटी इतका निधी प्राप्त झाला. यामध्ये वस्तुस्थिती थोडी वेगळी आहे. आपला डी.पी.आर. 1534.4 कोटी रुपयांचा तयार झाला. आपणास 1753.19 कोटी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33743...

श्री.भास्कर जाधव....

रुपये वाढीव खर्चासह मंजूर झाले. आजवर 1623.71 कोटी रुपये प्राप्त झाले त्यापैकी 1585.01 कोटी रुपये इतका खर्च झाला.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारले की, एकूण 11 प्रकल्प होते त्यापैकी 4 प्रकल्प पूर्ण झाले तर उर्वरित 11 प्रकल्पांची कामे केव्हा पूर्ण होणार आहेत. त्याबाबत सांगू इच्छितो की, उर्वरित 7 प्रकल्पांपैकी 5 प्रकल्पांची 85 ते 90 टक्के कामे पूर्ण झालेली आहेत तर 2 प्रकल्पांची कामे 70 ते 72 टक्क्यांपर्यंत पूर्ण झालेली आहेत. या योजनेंतर्गत आपणास 44 हप्त्यांमध्ये निधी मिळतो. त्यापैकी 41 हप्ते मिळाले आहेत. एकूण 33 युटीलायझेशन सर्टीफिकेट द्यावी लागतात. त्यापैकी 31 पूर्ण झालेली आहेत तर 2 पूर्ण व्हावयाची आहेत. मार्च 2013 पर्यंत सर्व प्रकल्प पूर्ण करण्याचा महानगरपालिकेचा प्रयत्न आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारले की, प्रकल्प रखडण्याची कारणे शोधली आहेत काय, त्याबाबत सांगू इच्छितो की, त्याची वेगवेगळी कारणे आहेत. काही प्रकरणी जागा उपलब्ध नाही. काही ठिकाणी प्रकरण कोर्टात गेले आहे. रखडलेल्या कामांची चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात येईल का असेही त्यांनी विचारले. त्याबाबत सांगू इच्छितो की, आज तरी समिती नेमण्याची आवश्यकता वाटत नाही. डी.एम.लेव्हलवर या कामांचा सातत्याने आढावा घेण्यात येतो. परंतु सन्माननीय सदस्यांचा आग्रह असेल तर राज्यमंत्री म्हणून माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या परवानगीने या कामांचा आढावा घेण्यास आम्ही तयार आहोत.

यानंतर श्री.सरफरे...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

ता.प्र.क्र. 33743...

श्री. जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, जेएनएनएमयुआर अंतर्गत राज्यातील मोठया महानगरपालिकांपैकी नाशिक महानगरपालिकेमध्ये घेण्यात आलेल्या योजनांमध्ये निधीचा अपहार किती उत्तम प्रकारे करता येतो हे या महानगरपालिकेच्या एकूण कारभारावरुन स्पष्ट झाले आहे. घरकुल योजनेसाठी टेंडर काढण्यात आले परंतु जवळपास जागा उपलब्ध नसल्यामुळे ती योजना पूर्ण होऊ शकली नाही. त्याचप्रमाणे भूमिगत गटार योजनेसाठी टेंडर काढून सुध्दा ती योजना पूर्ण होऊ शकली नाही. घरकुल योजनेमधील लाभार्थी निश्चित करण्यात आले नाही. काही लोक घरामध्ये रहावयास जाणार आहेत परंतु त्यांना घर देण्यात आले नाही. महानगरपालिकेने अशा ढोबळ चुका करुन सरकारचा पैसा पाण्यामध्ये घालविला आहे ही गोष्ट खरी आहे काय, असल्यास त्याची चौकशी करण्यात येईल काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, एमएमआरडीएच्या रिजनबाहेर पुणे, पिंपरी-चिंचवड, नांदेड, नाशिक या शहरांकरिता जेएनएनएमयुआर योजनेंतर्गत निधी देण्यात आला. नाशिक शहराच्या स्थानिक लोकप्रतिनिधींनी याबाबतची माहिती आपल्या निदर्शनास आणून दिली व वर्तमानपत्रामध्ये छापून आलेली बातमी देखील आपण वाचली आहे. त्यामुळे निश्चितपणे या बाबत उच्च स्तरीय चौकशी करुन त्यामध्ये जे कुणी दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, पुण्यानंतर नाशिकबाबत प्रश्न विचारण्यात आला त्यावेळी माननीय मंत्र्यांनी याकरिता वेगळा प्रश्न विचारावा असे सांगणे आवश्यक होते. विरोधी पक्षाकडून अशाप्रकारे प्रश्न विचारला जातो त्यावेळी मंत्रीमहोदयांकडून याकरिता वेगळा प्रश्न विचारावा असे सांगितले जाते.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, हा माझ्यावर अन्याय आहे. प्रश्न सर्वसाधारण स्वरुपाचा असेल तर त्याबाबत मी जास्तीत जास्त माहिती देण्याचा नेहमी प्रयत्न करतो.

सभापती : मंत्रीमहोदयांनी एक गोष्ट निश्चितपणे लक्षात ठेवावी की, 25-30 वर्षापूर्वी मी सुध्दा राज्यमंत्री होतो त्यावेळी सन्माननीय सदस्यांना "आपण याकरिता वेगळा प्रश्न विचारणे आवश्यक आहे, त्यामुळे आपण विचारलेल्या प्रश्नाला मला उत्तर देता येणार नाही" असे सांगत होतो. मुळात मंत्रीमहोदय एकदा उत्तरामध्ये अडकले की, दुसऱ्यावेळी त्यांनी संभाळून रहावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, त्यावेळी आघाडीचे सरकार नव्हते, एकाच खात्याचे एकच राज्यमंत्री होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 33743...

सभापती : तसे काही नाही, सौजन्य म्हणून माननीय सदस्यांनी विचारलेल्या अन्य प्रश्नांनाही उत्तर देण्याचा मंत्रीमहोदय प्रयत्न करतात.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, महत्वाच्या प्रकल्पाच्या उभारणीमध्ये बऱ्याच वेळा दिरंगाई होत असल्यामुळे प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचे वेळापत्रक बिघडते, प्रकल्पाची किंमत वाढते असा अनुभव आहे. या बाबतीत माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, एखाद्या प्रकल्पाचे टाईम शेडयुल्ड बिघडल्यामुळे त्या संदर्भात शासनाने कारवाई केली तर बाकीच्या प्रकल्पाबाबत डिले होणार नाही या करिता शासनातर्फे अधिकाऱ्यांपर्यंत संदेश जाणे आवश्यक आहे. सदरचा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी किती कालावधी विहित केला होता, त्या कालावधीमध्ये ठेकेदाराने काम पूर्ण केले नसेल तर त्याच्यावर कोणती कारवाई केली?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मार्च 2013 पर्यंत हा प्रकल्प पूर्ण करण्याचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. या करिता केंद्र सरकारने मुदत वाढवून दिली आहे. दुसरी गोष्ट अशी की, पुण्यासारखे शहर असल्यामुळे त्या शहरामध्ये महसूल विभागाच्या तर काही संरक्षण विभागाच्या जागा असल्यामुळे हे प्रकल्प रखडले आहेत. त्या करिता ठेकेदाराला जागा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. काही ठिकाणी जागेच्या बाबतीत न्यायालयाकडून हस्तक्षेप करण्यात आल्यामुळे काही प्रकल्प रखडले आहेत. माननीय सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रकल्प मुदतीत पूर्ण झाले नाही तर त्याची दखल घेण्यासंबंधीचा संदेश कुठेतरी जाणे आवश्यक आहे. त्याबाबत सजेशन फॉर ॲक्शन.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, पुणे शहरातील संरक्षण खात्याच्या अनेक जागा पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतरित न झाल्यामुळे विकासाची अनेक कामे रखडली आहेत. त्यामुळे प्रकल्पाची किंमत वाढते आणि प्रकल्प पूर्ण करण्याचा कालावधी देखील वाढतो. यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की, पुणे शहरामध्ये लष्करी सदर्न कमांडचे अधिकारी किंवा अन्य लष्करी अधिकाऱ्यांची एक बैठक घेऊन पुणे शहर विकासाचे रखडलेले अनेक प्रकल्प मार्गी लागण्यासाठी आपण पुण्यामध्ये एक बैठक घेणार काय?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, जेएनएनयुआरएमचे अनेक प्रकल्प काही ना काही कारणांमुळे अडकले आहेत. त्यामध्ये संरक्षण खात्याच्या जागेच्या बाबतीत असलेला आक्षेप

अशोधित प्रत / शोधनीयपणे नाही

ता.प्र.क्र. 33743...

श्री. पृथ्वीराज चव्हाण.....

किंवा जागेच्या मालकीचा विषय असेल त्यापैकी काही ठिकाणी एक्स्प्लोझिव्हचे डेपो असतात ती जागा रेड झोनमध्ये असते. त्या रेड झोनमध्ये किती जागा आरक्षित ठेवावी या संदर्भात प्रामाणिक मतभेद आहेत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33743 . . . .

श्री.पृथ्वीराज चव्हाण . . . .

यामुळे बरेच प्रकल्प अडकलेले आहेत. आम्ही प्राथमिक स्वरुपामध्ये पुण्यातील लष्करी अधिकाऱ्यां-बरोबर चर्चा केलेली आहे. पण केवळ त्यांच्या लेव्हलवर प्रश्न सुटेल असे नाही. कारण संरक्षण विभागाचा जो इन्स्टेट विभाग आहे आणि त्यांची जमिनीच्या बाबतीत फारच कडक भूमिका असते. येथे दोन्ही ठिकाणी काही मतभेद आहेत किंवा यासंबंधातील माहितीबद्दल किंवा तथ्याबाबत काही मतभेद असतील तर ते आम्ही निश्चितपणे सोडवू. शेवटी हा विषय केंद्रीय संरक्षण खात्याच्या अधिपत्या मार्फत आणि दिल्ली येथील अर्बन डेव्हल्पमेंट मिनिस्ट्री बरोबर चर्चा करुन हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने आमचा पाठपुरावा सुरु आहे. आम्ही याबाबतीत सतत पाठपुरावा करु. तसेच याबाबतीत आम्हाला ज्या-ज्या पध्दतीने प्रयत्न करता येतील ते सर्व करु. कारण हे अतिशय महत्वाचे प्रकल्प आहेत आणि यासाठी केंद्र शासनाने निधी उपलब्ध करुन दिलेला आहे आणि या कामासाठी जरी 2014 पर्यंत मुदत वाढवून दिलेली असली तरी जोपर्यंत हा प्रश्न सुटत नाही तोपर्यंत हे प्रकल्प पूर्ण होणार नाहीत. त्यामुळे याबाबत आम्ही निश्चितपणे पाठपुरावा करीत आहोत आणि यासाठी ज्या पातळीवर आवश्यकता भासेल त्या पातळीवर आमची चर्चा करण्याची तयारी आहे.

2ए-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गेवराई (जि.बीड) तालुक्यातील गोदावरी नदीकाठच्या गावातील पाण्याचे नमुने दूषित आढळल्याबाबत

(4) *34701 श्री.अमरसिंह पंडित : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) गेवराई (जि.बीड) तालुक्यातील गोदावरी नदीकाठच्या गावातील पिण्याच्या पाण्याचे नमुने दूषित असल्याचे माहे एप्रिल, 2012 मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, दूषित पाण्यामुळे गोदाकाठच्या गावांमध्ये अनेक साथीच्या रोगांचा फैलाव झाला, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, ग्रामीण भागात नागरिकांना शुध्द पाणी-पुरवठा व्हावा म्हणून पाणी शुध्दीकरण यंत्रणा संबंधित गावांमध्ये बसविण्यात येणार आहे काय,

(4) असल्यास, याबाबत शासनाकडून कायमस्वरुपी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे ?

प्रा.लक्ष्मणराव ढोबळे :(1) हे अंशत: खरे आहे. माहे एप्रिल 2012 मध्ये एकूण 176 हातपंपाच्या पाणी नमुन्यांची अणुजीव तपासणी करण्यात आली त्यापैकी गोदावरीकाठच्या 13 गावातील पाणी नमुने 10 टक्केपेक्षा जास्त दूषित असल्याचे आढळून आले आहेत.

(2) हे खरे नाही.

(3) ज्या गावांतील हातपंपाचे पाणी नमुने दूषित झाले आहेत असे दूषित उदभव बंद करण्यात आले असून गावातील इतर हातपंप उद्भवाचे निर्जंतुकीकरण व साफसफाई, धुरळणी करुन संबंधित गावास शुध्द पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(4) राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गत उपाययोजना करण्यात येत आहेत.

परळी (जि.बीड) तालुक्यातील जलस्वराज्य योजनेच्या कामाबाबत.

(13) *33901 प्रा.सुरेश नवले, श्री.संजय दत्त,डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री

पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) परळी (जि. बीड) तालुक्यातील सोनहिवरा जलस्वराज्य योजनेचे 18 लाख रूपये राष्ट्रीयकृत बँकेत पडून असून नळयोजनेची कामे सुरू न झाल्याने बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागात बाराही महिने टँकरने पाणी पुरवठा केला जात असल्याचे माहे ऑगस्ट-2012 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, बीड जिल्ह्यात जलस्वराज्य योजनेचे काम लवकरात लवकर सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) असल्यास, अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.लक्ष्मणराव ढोबळे : (1) होय, हे खरे आहे.

(2) मौ.सोनहिवरा, ता.परळी, जि.बीड या गावाचा समावेश जलस्वराज्य प्रकल्प सन 2005-06 च्या कृती आराखडयामध्ये करण्यात आला होता. परंतु, काही तांत्रिक कारणामुळे योजनेची कामे सुरु झाली नसल्याने सदरचे गाव वगळण्याबाबत तसेच सदर गावातील कामे जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत हाती घेण्यात येऊ नये व योजनेची गरज लक्षात घेऊन सदर योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कार्यक्रमातील मार्गदर्शक सूचनांप्रमाणे हाती घेणेबाबत जिल्हास्तरावर कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार सोनहिवरा पाणी पुरवठा योजनेचा राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमाच्या 2012-13 च्या आराखडयात समावेश करण्यात आला आहे.

सद्य:स्थितीत जलस्वराज्य योजनेच्या स्टेट बँक ऑफ इंडिया, परळी खात्यामध्ये शासन अनुदान लोक वर्गणी व व्याजाची रक्कम असे एकूण रुपये 22,61,125/- एवढी रक्कम जमा आहे. जलस्वराज्य प्रकल्प माहे जून-2011 अखेरीस बंद करण्यात आला आहे.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, माझ्या समोर सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त आहेत. त्यामुळे आपल्या नजरेस पडत नाही म्हणून मी उभा राहिलो. अनु.क्र.4 व अनु.क्र.13 वरील दोन्ही प्रश्न सारखेच असल्याने ते एकत्रितपणे चर्चेसाठी घ्यावेत अशी माझी विनंती आहे.

सभापती : ठीक आहे.

प्रा.लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, माझी हरकत नाही.

सभापती : ठीक आहे. ता.प्र.क्र.34701 व ता.प्र.क्र.33901 एकत्रितपणे चर्चेला घेण्यात येतील.

श्री.लक्ष्मणराव ढोबळे : सभापती महोदय, मला आपल्या अनुमतीने तारांकित प्रश्न क्रमांक 34701 ला दिलेल्या उत्तरात पुढीलप्रमाणे दुरुस्ती करावयाची आहे. उपप्रश्न क्र.1 च्या उत्तरामध्ये "हे अंशत: खरे आहे." यानंतर "हातपंपाची पहाणी आणि सार्वजनिक नळ पाणीपुरवठा योजनांची पहाणी करण्यात आली." असे वाचावे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, याठिकाणी अनु.क्र.2 मध्ये प्रश्न विचारण्यात आला आहे की, "असल्यास, दूषित पाण्यामुळे गोदाकाठच्या गावांमध्ये अनेक साथीच्या रोगांचा फैलाव झाला, हे ही खरे आहे काय? याबाबत उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की,"हे खरे नाही." परंतु वर्तमानपत्रामध्ये आलेल्या बातम्यांनुसार साधारणपणे 11 गावे अशी आहेत की, त्याठिकाणी कॉलऱ्याची लागण झाली होती. तसेच तेथील 3-4 गावांमध्ये साधारणपणे टायफॉईडची लागण इ ालेले नऊ पेशंट आढळले होते.

सभापती महोदय, तसेच याठिकाणी पहिल्या प्रश्नामध्ये म्हटलेले आहे की,"हे अंशत: खरे आहे."पण डिस्ट्रीक्ट पब्लीक हेल्थ लॅबोरेटरीज्च्या मेडिकल रिपोर्ट मधून असे दिसते की, संबंधितांच्या शरिरातील कॅल्शिअम कॉर्बोनेटचे प्रमाण 1002 मिलिग्रॅम आहे. त्याचे डिझायरेबल लिमिटस् 300 मिलिग्रॅम आणि परमिसिबल लिमिट 600 मिलिग्रॅम आहे आणि याठिकाणी कॅल्शिअम

ता.प्र.क्र.33901 . . . .
श्री.अमरसिंह पंडित . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कॉर्बोनेटचे अस्तित्व 1002 मिलिग्रॅम इतके आहे आणि अशा वेळी ते प्रमाण अंशत: आहे असे कसे म्हणता येईल. त्यामध्ये नायट्रेटचे देखील प्रमाण आहे आणि असे असतानाही जर आपण ते प्रमाण अंशत: आहे असे म्हणत असलो तर ते चुकीचे होणार आहे. या गावांमध्ये 10 हजार पेक्षा जास्त लोकवस्ती आहे. धोंडराई, तलावडा, शनीचे क्षेत्र असलेले राक्षसभवन ही गावे आहेत. अशा वेळी जर तेथील नायट्रेटचे प्रमाण अंशत: आहे असे सांगण्यात येत असेल तर योग्य नाही. याबाबतीत डिस्ट्रीक्ट पब्लिक हेल्थ विभागाचे रिपोर्ट आहेत. असे असताना तेथे नायट्रेटचे प्रमाण अंशत: आहे असे म्हणत असतील तर ते चुकीचे होईल. त्यामुळे माझा एक स्पेसिफीक प्रश्न आहे की, या तिन्ही गावांमध्ये जेथे 10 हजार पेक्षा जास्त लोकवस्ती आहे तेथे फिल्टर प्लॅन्टच्या प्रस्तावित कामाला आपण मान्यता देणार आहात काय ?

प्रा.लक्ष्मणराव ढोबळे : सभापती महोदय, याठिकाणी "अंशत: खरे आहे" असे म्हणण्या-मागील हेतू एवढाच होता की, गोदाकाठावरील 29 गावांमध्ये दूषित पाण्यामुळे रोगराईची स्थिती निर्माण झालेली आहे आणि या संदर्भात प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. याबाबतीत 176 पाण्याचे नमुने तपासण्यात आले असून त्यापैकी फक्त 13 गावांमधील पाणी दूषित असल्याचे आढळून आले आहे. 29 गावातील पाणी दूषित नाही तर 13 गावातील पाणी दूषित आहे. त्यामुळे याबाबत उत्तर देत असताना "अंशत: खरे आहे" असे म्हटलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी फक्त तीन गावांच्या बाबतीत प्रश्न विचारलेला आहे. त्या ठिकाणी आपण "आर-ओ" सिस्टीम सुरु करणार आहात काय? असे विचारण्यात आले आहे. याबाबत सांगावयाचे तर या तिन्ही गावांमध्ये जर रेड लेबल लागलेले असेल आणि तेथील पाणी दूषित असल्याबाबत रिपोर्ट लॅबमधून आला असेल तर सन्माननीय सदस्यांच्या सूचनेचा आदर केला जाईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, याठिकाणी माननीय मंत्री महोदय हे "अंशत:" बाबत बराच खुलासा करीत आहेत पण त्यांनी त्याच्या पुढच्या गोष्टींबाबत खुलासाच केलेला नाही. याठिकाणी प्रश्नामध्ये असे दिले आहे की, असल्यास, याबाबत शासन निर्णय घेतला आहे काय आणि त्याचे स्वरुप काय आहे?

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

लागण झाल्याच्या बाबतीत उत्तरात उल्लेख केलेला नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, तेथील काही लोकांना टायफाईड झालेला आहे, काही लोकांना इतर रोगांची लागण झालेली आहे. त्याबाबत उत्तरामध्ये उल्लेख केलेला नाही. 'अंशत: जरी खरे असले तरी आपले ते कर्तव्य आहे. कदाचित 29 गावांमध्ये नसेल परंतु या तीन गावामध्ये या रोगराईची जी लागण झाली त्या बाबतीत शासनाने काय केले याचा उत्तरामध्ये अजिबात उल्लेख नाही. शेवटी असे उत्तर दिले आहे की, राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गत उपाययोजना करण्यात येत आहेत. परंतु या तीन गावांमध्ये जी रोगराईची लागण झालेली आहे किंवा ज्या अशुद्ध पाण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी लेबॉरटरीचे जे विश्लेषण दिले आहे ते फार घातक आहे. 600 मिलिग्रामपर्यंत परमिसिबल असताना त्या ठिकाणी 1 हजार मिलिग्रामपर्यंत प्रमाण निदर्शनास आले ही गंभीर बाब आहे. त्या बाबतीत शासन काय उपाययोजना करणार आहे ?

प्रा. लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, साधारणपणे ज्या 13 गावांमध्ये पाणी दूषित आढळून आले त्या ठिकाणी किंवा तीन गावांमध्ये अतिदूषित पाणी आढळून आले त्याही गावांमध्ये ज्या सूचना करण्यात आलेल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे आहेत. परिसर जो अस्वच्छ ठेवलेला आहे त्याची स्वच्छता करावी. ज्या गावात अनियमित शुद्धीकरण आढळून आलेले आहे त्या ठिकाणी पाणी शुद्ध करण्याची पावडर वापरण्याबद्दलची नियमितता पाळावी. हातपंपाजवळीत खड्डयात जे पाणी साचते अशा प्रकारचे साचलेले पाणी त्या ठिकाणावरुन नाहीसे करावे. नळ गळत्या दुरुस्त करण्याबद्दलचा विचार प्राधान्याने करावा. कारण ते अशुद्ध पाणी त्या नळांमध्ये जाऊ शकते. गटारीतून पाईपलाईनव्दारे जे कनेक्शन देण्यात आलेले आहेत त्याबद्दल देखील त्या ठिकाणी सूचना देण्यात आलेल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी या सर्व प्रश्नाबद्दल किंवा तीनही गावांबद्दल ज्या सूचना केलेल्या आहेत त्याची निश्चितपणे काळजी घेऊन त्या ठिकाणी जे उद्भव आहेत त्यातील कोणताही उद्भव दूषित नसल्याची खात्री केलेली आहे. या 13 गावांमध्ये दूषित पाण्याबद्दलच्या ज्या गोष्टी आढळून आलेल्या आहेत त्या सर्व हापशाच्या संदर्भात आहेत, त्या नळ पाणी पुरवठ्याबद्दलच्या नाहीत. स्त्रोत निवडलेल्या योजना दूषित नाहीत. फक्त ज्या ठिकाणी खोलवरुन हापशातून पाणी घेतलेले आहे त्या ठिकाणच्या योजनाच फक्त दूषित असल्याचे विभागाला निदर्शनास आलेले आहे. याबद्दल निश्चितपणाने काळजी घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 34701 व 33901.....

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांच्याकडे प्रयोगशाळेचा अहवाल आहे. धोंडराई, तलावडा व राक्षसभवन या तीनही गावांची लोकसंख्या 10 हजार पेक्षा जास्त आहे. त्यामुळे या गावांमध्ये प्राधान्याने जल शुद्धीकरण योजना राबविणार का ?

प्रा. लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, या प्रश्नाचे उत्तर मी आधीच दिलेले आहे. जर रेड लेबल असेल किंवा लॅबचा जर रिपोर्ट आला तर सन्माननीय सदस्यांना विश्वासात घेऊन त्या ठिकाणी पाणीपुरवठ्याबद्दल आर.ओ.सिस्टिम राबविण्यात येईल.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, मागच्या अधिवेशनकाळामध्ये सुध्दा मी सूचना केली होती. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये कमीअधिक प्रमाणात अशा स्वरुपाच्या बातम्या सातत्याने येत असतात की, दूषित पाण्यामुळे रोगराई होते किंवा अनेक रोग फैलावतात. मी अशी सूचना केली होती की, ज्या गावांमध्ये नळ पाणीपुरवठा योजना आपण राबवितो किंवा ज्या ठिकाणी योजना सुरु आहेत त्या ठिकाणी पाण्याचे जे स्त्रोत आहेत, त्यातून जे पाणी उचलले जाते आणि नळ पाणीपुरवठा योजनेसाठी दिले जाते ते पाणी नळ योजनेमध्ये देण्यापूर्वी शुद्ध करण्यासाठी ज्याला आपण वॉटर फिल्ट्रेशन प्लांट म्हणतो त्याची किंमत जास्त नसते, साधारणत: 10 हजार लिटर पाण्याचे शुद्धीकरण तासामध्ये करावयाचे असेल तर साडेचार ते पाच लाख रुपयांमध्ये हे प्लांट्स उपलब्ध आहेत, त्याला मीठ लागते, दुसरे फार काही लागत नाही, असे जे प्लांट्स उपलब्ध आहेत अशा स्वरुपाचे प्लांट्स संपूर्ण महाराष्ट्रामध्ये वेगवेगळ्या गावांमध्ये ज्या ज्या ठिकाणी नळ पाणीपुरवठा योजना आहेत किमान त्या ठिकाणी ग्रामपंचायतीने बसवावेत म्हणून काही प्रोत्साहनपर योजना शासन राबविणार का ? जर काही आमदार आपल्या निधीतून अशा स्वरुपाचे प्लांट्स बसविण्यासाठी निधी देऊ इच्छित असतील तर त्यासाठी लागणारी जी परवानगी आहे ती प्लांनिंगच्या माध्यमातून मिळवून देणार का ?

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. लक्ष्मण ढोबळे : दुस-या प्रश्नाचे उत्तर "होय" असे आहे. पहिल्या प्रश्नाच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, अशा प्रकारचे पाणी शुद्ध करताना त्या गावाच्या टाकीमध्ये पाणी जाण्याआधी ते शुद्ध करणे आवश्यक असते. तशा प्रकारचा प्लॅण्ट तेथे बसविणे आवश्यक आहे. त्याबाबतीत निश्चितपणे उपाययोजना करु शकू.

श्री. विनायक मेटे : मंत्री महोदय एक साखरेच उत्तर देत आहेत. सभापती महोदय, आपणच त्यांच्या उत्तराला आक्षेप घेतला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी लॅबचे सर्टिफिकेट आहे असे सांगितले. त्याच लॅबचे सर्टिफिकेट मंत्री महोदयांकडे नाही. याचा अर्थ त्या गावातील गरीब जनतेला मंत्री महोदय न्याय देऊ इच्छित नाही. ग्रामीण भागातील गरीब लोकांच्या पिण्याच्या पाण्याच्या बाबतीत मंत्री महोदयांनी अशी भूमिका घेणे योग्य नाही. या प्रश्नाकडे सकारात्मक दृष्टीने पहाणे अतिशय गरजेचे आहे. तीन गावापैकी राक्षस भवन हे तीर्थक्षेत्राचे गाव आहे. त्या ठिकाणी अनेक भाविक येत असतात. म्हणून अशा ठिकाणी ताबडतोबीने जलशुद्धीकरण यंत्रणा बसविण्यात येईल काय, तसेच रिपोर्टमध्ये दुरुस्ती करुन त्यानुसार उपाययोजना करण्यात येईल काय ?

प्रा. लक्ष्मण ढोबळे : आपण ज्या हापशाच्या योजनेतून गावासाठी पाणी घेतो त्या हापशावर आरओ सिस्टिम बसविणे योग्य नाही हा विभागाचा निर्णय आहे. तसेच दूषित उद्भवापासून गावाला पाणी मिळत असेल आणि ते पाणी वापरु नका अशा प्रकारचे रेड लेबल प्रमाणपत्र लॅबने दिले असेल तर त्या ठिकाणी आरओ सिस्टिम बसविण्यास आम्ही तयार आहोत असे उत्तर मी दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांबद्दल आदर राखून मी पुनश्च खुलासा केला आहे.

श्री. अमरसिंह पंडित: त्या ठिकाणी हॅण्डपम्प आहेत असे मंत्री महोदय वारंवार सांगत आहेत. डिस्ट्रिक्ट पब्लिक हेल्थ लॅबचे आमच्याकडे सर्टिफिकेट आहे. हे सर्टिफिकेट हापशाच्या पाण्याचे नाहीत. धोंडराई, तलवडा आणि राक्षस भवन ही 10 हजार लोकवस्तीची गावे आहेत. हे उद्भव कोणत्या तरी वस्तीतील नाहीत तर नदीपात्रातील आहेत. दहा वर्षापासून ही परिस्थिती आहे. तेव्हा या जलशुद्धीकरणाच्या प्रस्तावांना परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन तातडीने मान्यता देण्यात येईल काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. लक्ष्मण ढोबळे : हापशावर करावयाच्या योजनांच्या बाबतीत मी "नाही" असे उत्तर दिलेले आहे. जेथे उद्‌भव खराब आहे आणि जेथे सन्माननीय सदस्य मागणी करीत आहेत त्याबाबतीत मी "होय" असे उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या पाणी पुरवठा योजनांचा स्त्रोत खराब असेल तर त्या ठिकाणी आरओ सिस्टिम बसविण्यास आम्ही मान्यता देऊ.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पडझड होऊन झालेल्या दुरवस्थेबाबत

(५) * ३३५१३ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.विक्रम काळे, श्री.किरण पावसकर,श्री.रमेश शेंडगे, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बी.डी.डी.चाळीची मोठ्या प्रमाणात पडझड होऊन दुरवस्था होत असून या चाळींचा ऐतिहासिक वास्तूच्या यादीत समावेश केल्यामुळे पुनर्विकासास विलंब होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीच्या पडझडीत मनुष्य हानी होऊ नये म्हणून पुनर्विकास करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सचिन अहिर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (१) व (२) बी.डी.डी. चाळी ९० वर्षे इतक्या जुन्या आहेत. सदर चाळींच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. तथापि, मंत्रालयात दि. २१ जून, २०१२ रोजी लागलेल्या आगीमध्ये सदर धारिका नष्ट झाल्याने उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे धारिका पुनर्बांधणी करुन प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मला उत्तरामध्ये थोडी सुधारणा करावयाची आहे. ती करण्यास आपण मला परवानगी द्यी अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती : ठीक आहे.

श्री. सचिन अहिर : उत्तराच्या भाग (१)मध्ये "होय" असे वाचावे. बाकी छापल्याप्रमाणे.

श्री.प्रकाश बिनसाळे : मुंबईतील बी.डी.डी. चाळी ह्या ९० वर्षाच्या जुन्या चाळी आहेत. या चाळी सरकारच्या मालकीच्या आहेत. खाजगी मालकीच्या चाळींना सेस लावण्यात येत असल्यामुळे त्या चाळींच्या दुरुस्तीचे वेगळे नियम आहेत. मात्र या बी.डी.डी.चाळींच्या पुनर्विकासाचा प्रश्न गेल्या अनेक वर्षापासून रेंगाळलेला आहे. मध्यंतरी असेही ऐकण्यात येत होते की, या बी.डी.डी. चाळी ९० वर्षाच्या जुन्या असल्यामुळे त्यांना हेरिटेजचा दर्जा देण्याचा प्रयत्न होत आहे. या चाळींच्या पुनर्विकासाच्या संदर्भातील धारिका आगीत नष्ट झाल्याचे छापील उत्तरामध्ये नमूद केलेले आहे. या चाळींची अत्यंत दूरवस्था झालेली असून लोक जीव मुठीत धरुन रहात आहेत. या चाळींचा लवकरात लवकर पुनर्विकास करावा अशी त्या चाळीत राहाणा-या लोकांची मागणी आहे.

....नंतर श्री. गिते....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंदी

सदरहू चाळींच्या पुनर्वसनाचा प्रश्न शासन किती दिवसात सोडविणार आहे ? मुंबईतील उपकर प्राप्त इमारती आहेत त्यांना सध्या 300 चौरस फुट एवढे क्षेत्रफळ देण्यात येत आहे. धारावी पुनर्विकासाच्या प्रकल्पाच्या अनुषंगाने तेथील जनतेची मागणी येऊ लागली आहे की, तेथील रहिवाश्यांना 400 चौरस फूट एवढे क्षेत्रफळ हवे आहे.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास सुरु होऊन जवळपास 50 मिनिटांचा कालावधी झालेला आहे. हा अतिशय महत्वाचा प्रश्न असल्यामुळे मी आणखी दोन सन्माननीय सदस्यांना उप प्रश्न विचारण्याची परवानगी देणार आहे. उप प्रश्नाच्या नावाखाली आपणच बोलावे असा याचा अर्थ होत नाही. तुम्ही स्पेसिफिक प्रश्न विचारावा.

श्री.प्रकाश बिनसाळे : या इमारतींच्या पुर्नर्विकासासाठी विशेष योजना घेणार आहात काय ?

श्री.सचिन अहिर : सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, डी.सी.रुल मधील 67(3) प्रमाणे स्थानिक स्तरावरील समितीने सूचना केली होती की, ही बी.डी.डी.चाळ देखील हेरिटेजमध्ये घेतली पाहिजे. शेडयूल 3 मध्ये याचा समावेश करावा काय ? मला या प्रश्नाच्या माध्यमातून सांगावे लागेल की, ही गोष्ट प्रस्तावित आहे. त्यांनी सजेशन्स दिलेल्या आहे. त्यानंतर त्यावर सूचना व हरकती मागविण्यासंबंधीची कार्यवाही होईल. त्यानंतर याबाबतचा निर्णय शासन स्तरावर होईल. सदरच्या चाळी शेडयूल 3 मध्ये जरी गेल्या, तरी वेळ आली तर त्या चाळीची दुरुस्ती करता येते किंवा पुनर्बांधणी करण्याची देखील मुभा या शेडयूलमध्ये आहे. परंतु कोणत्याही प्रकारे पुनर्बांधणीला अडथळा येऊ नये म्हणून या चाळी हेरिटेजमधून वगळाव्यात अशीही भूमिका गृहनिर्माण विभागाच्या माध्यमातून घेतली गेलेली आहे. ज्यावेळी हे प्रस्ताव आयुक्तांकडून शासनाकडे येतील, त्यावेळी शासनाच्या स्तरावर या बाबतचा निर्णय घेऊन या चाळी हेरिटेज यादीमधून बाहेर काम निश्चितपणे केले जाईल.

सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न विचारला त्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, पुनर्बांधणीच्या बाबतीतील जी नस्ती होती, ती जळाल्यामुळे आता आपण त्याला रिकॉन्स्टीटयूट केलेले आहे. ते काम पूर्ण झालेले आहे. महिन्याभरात तो प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन करुन घेऊन माननीय मुख्यमंत्री महोदयांसमोर आणि मंत्रिमंडळाच्या बैठकी समोर आणण्याचा प्रयत्न राहील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.33513....

ॲड.अनिल परब : हेरिटेज संदर्भात निकष लावले आहेत. मुंबईत बी.डी.डी.चाळी बरोबरच मुंबई शहरातील असंख्य सेस इमारती पडण्याच्या मार्गावर आहेत. त्या इमारती कोणत्याही क्षणी पडू शकतात. आपण जनतेकडून हरकती व सूचना मागविल्या आहेत. त्या धूळ खात पडल्या आहेत. फक्त हेरिटेज वास्तू एवढाच संबंध नाही तर त्याच्या आजुबाजूचा परिसर देखील विकसित होऊ शकत नाही. आपण याची तपासणी करुन अशा एकूण किती इमारतींच्या पुनर्बांधणीचे प्रस्ताव रखडले आहेत याची माहिती घेतली आहे काय आणि अशा इमारती कोसळल्या तर त्याची जबाबदारी शासन स्वीकारणार आहे काय, या चाळींबाबत किती दिवसात निर्णय घेऊन या चाळी कोसळण्यापासून वाचविणार आहात ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट नाकारता येणार नाही. निव्वळ बीडीडी चाळीच नव्हे तर शहरातील उपकर प्राप्त इमारतींचा देखील समावेश यादीमध्ये करण्याचे काम हेरिटेज कमिटीने केलेले आहे. निश्चितपणे जी भूमिका बीडीडी चाळींच्या बाबतीत आहे तीच भूमिका उपकर प्राप्त इमारतींबाबत राहणार आहे. कारण या इमारतींचा पुनर्विकास होणे गरजेचे आहे. या इमारती मोडकळीस आलेल्या आहेत. या इमारतींचा पुनर्विकास केला नाही तर कालांतराने या इमारती पडू शकतात. म्हणून नगरविकास विभागाच्या वतीने तातडीने आयुक्तांना सूचना देण्यात येतील. सजेशन्स आणि ऑब्जेक्शनसाठी ...(अडथळा)...आपल्याला बंधन घालता येणार नाही. त्यासाठी आपल्याला स्पेसिफीक वेळ द्यावा लागतो. हा विषय गृहनिर्माण विभागाशी संबंधित नसून नगरविकास विभागाशी संबंधित आहे. म्हणून त्यांना सूचना देण्यात येतील.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी प्रश्न विचारण्यासाठी उभे असतात.)

नंतर श्री.भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, बीडीडी चाळींबाबत या सभागृहात यापूर्वी अनेकदा प्रश्न चर्चेला आलेले आहेत. धारावी प्रकल्पाच्या पुनर्विकासासाठी यंत्रणा राबविली जाते. आर्किटेक्ट नेमले जाऊन त्यांना फी दिली जाते. शासनाकडे श्री.सीताराम कुंटे, श्री.देबाशिष चक्रवर्ती यांच्यासारखे अनेक सक्षम अधिकारी आहेत. या अधिकाऱ्यांकडे या चाळींच्या पुनर्विकासाचे काम सोपविले तर अधिक चांगल्याप्रकारे पुनर्विकास प्रकल्प मंजूर होऊ शकतो. बीडीडी चाळींची उभारणी 91 वर्षापूर्वी झालेली आहे. सर्वप्रथम प्रकल्प तयार होणार, तो प्रस्ताव मान्य केला जाणार आणि त्यानंतर चाळींची पुनर्बांधणी होणार आहे. ही योजना पूर्ण करण्यासाठी ठराविक कालावधी जाहीर केला जाईल काय?

सभापती महोदय, केवळ तेथील रहिवाशांना चांगली घरे मिळणार एवढ्यापुरता हा मर्यादित विषय नाही. या चाळींच्या पुनर्विकासामुळे मुंबई शहराच्या सौंदर्यामध्ये भर पडणार आहे. 93 एकर जागेवर या चाळींची उभारणी झालेली आहे. तेथे पोलीस वसाहत देखील आहे. पोलीस वसाहत, धारावी झोपडपट्टी आणि बीडीडी चाळींच्या पुनर्विकासासाठी स्वतंत्र प्रश्न विचारावे लागतात. प्रस्ताव तयार होत आहे असे वारंवार शासनाकडून उत्तर दिले जाते. शासनाकडे सक्षम अधिकारी असताना प्रस्तावाला विलंब का होतो? धारावी प्रकल्पाच्या धर्तीवर बीडीडी चाळींच्या पुनर्विकासासाठी कालमर्यादेत प्रस्ताव तयार होऊन पुनर्बांधणीच्या कामाला सुरुवात होईल काय?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे निश्चितपणे प्रशासनामध्ये काही चांगले अधिकारी कार्यरत आहेत. त्यांचे सहकार्य घेऊनच प्रस्ताव तयार केला. परंतु मंत्रालय इमारतीला आग लागल्यामुळे प्रस्तावाची नस्ती जळाली. ती नस्ती रि-जनरेट करीत आहोत. महिनाभरात हे काम केले जाईल. त्यानंतर प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर ठेवण्याचा आग्रह निश्चितपणे केला जाईल. तूर्त आर्किटेक्ट किंवा तज्ज्ञांची नेमणूक करण्याची गरज नाही. कशाप्रकारे पुनर्बांधणी करावी, तेथील भाडेकरुंच्या हिताचे रक्षण कसे करता येईल याचा निश्चितपणे विचार केला आहे. महिन्याभरात नस्ती रि-जनरेट करण्याचे काम करु. त्यानंतर प्रस्ताव मंत्रीमंडळापुढे सादर झाल्यानंतर त्याची चर्चा करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी बीडीडी चाळींच्या पुनर्बांधणीबाबत प्रश्न विचारला आहे. मंत्रालय इमारतीला आग लागल्यानंतर तिची दुरुस्ती तीन महिन्यात केली जाईल असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगूनही अद्याप त्या कामाचे टेंडर मंजूर होत नाही. मी त्या विषयाबाबत अधिक बोलू इच्छित नाही. परंतु बीडीडी चाळी या प्रामुख्याने माननीय गृहनिर्माण राज्यमंत्र्यांच्या मतदारसंघातील आहेत. तेथील भाडेकरुंच्या त्रासाची त्यांना चांगली कल्पना आहे. या प्रश्नाबाबत त्यांनी मोघम उत्तर देऊ नये. मंत्रालयाच्या दुरुस्तीबाबत जसे उत्तर दिले तसे उत्तर या चाळींच्या पुनर्बांधणीबाबत दिले तर तेथील भाडेकरुंना त्याचे अधिक दु:ख होणार आहे. या चाळींच्या पुनर्बांधणीचा प्रश्न मुंबई शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. माननीय मुख्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांनी जर या प्रश्नाचे उत्तर दिले तर तेथील भाडेकरुंना न्याय दिल्यासारखे होईल.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, गृहनिर्माण राज्यमंत्री महोदयांनी एक महिन्याच्या काळात नस्ती रि-जनरेट केली जाईल असे उत्तर दिले आहे. नस्तीची पुनर्बांधणी करुन मंत्रीमंडळापुढे प्रस्ताव सादर करण्याचा विषय होता. एक महिन्यात हे काम केले जाईल असे सांगितल्यामुळे त्याबद्दल वेगळे काही सांगण्याची गरज नाही. हेरिटेज लिस्टमध्ये या चाळींचा समावेश केल्यामुळे वेगळा प्रश्न निर्माण झाला आहे. त्याबद्दल मुंबई महानगरपालिकेने पुढील निर्णय घ्यायचा आहे आणि नंतर शासनाकडे यायचे आहे. बीडीडी चाळींचा परिसर हेरिटेज यादीमध्ये समाविष्ट केल्यामुळे त्याची वेगळी चर्चा सुरु आहे. मुंबई शहरामध्ये चार ठिकाणी या चाळी आहेत. शिवडी येथील चाळी मुंबई पोर्ट ट्रस्टच्या जमिनीवर उभारण्यात आलेल्या आहेत. त्यांच्याकडून ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागेल.

नंतर श्री.जुन्नरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण ...

260 चाळींपैकी शिवडीमध्ये एकंदर 12 चाळी असून त्या मुंबई पोर्ट ट्रस्टच्या जागेवर आहेत. इतर चाळी शासकीय मालकीच्या जमिनीवर असल्यामुळे त्यांच्या विकासासंदर्भात अडचण येणार नाही. तसेच मुंबई पोर्ट ट्रस्ट बरोबर सुध्दा यासंदर्भात चर्चा सुरु आहे. या ज्या इमारती आहेत त्या 90 वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या असल्यामुळे त्या धोकादायक झालेल्या आहेत. या इमारतींचा विकास लवकरात लवकर व्हावा यासाठी गेल्या मे महिन्यामध्ये मुख्य सचिवांनी बैठक घेऊन त्यामध्ये सर्व बाबी निश्चित केल्या होत्या. त्या बाबीच्या अनुषंगाने मंत्रिमंडळासमोर या विषयाची टिपणी नेण्याचा प्रयत्न झाला होता परंतु मंत्रालयाला लागलेल्या आगीमध्ये ही टिपणी जळाली. मध्यंतरीच्या काळात हेरिटेज लिस्टचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यामुळे हे दोन्ही प्रश्न एकत्रित घेऊन, नस्तींची पुनरर्बांधणी महिन्याभरात करुन ती मंत्री मंडळासमोर आणण्यात येईल. हेरिटेज यादी मध्ये काही स्ट्रक्चर्स घातले गेले असल्यामुळे आपल्याला मुंबई महानगरपालिका तसेच हेरिटेज कमिटी बरोबर चर्चा करुन, अंतिम निर्णय घेऊन पुढे जावे लागणार आहे. या चाळींची लवकरात लवकर पुनरर्बांधणी करुन त्या ठिकाणच्या लोकांना न्याय देण्याचा शासनाचा प्रयत्न राहणार आहे. त्यामुळे एक महिन्याच्या आत पुनरर्बांधणीचा व हेरिटेजचा निर्णय घेण्यात येईल एवढे या निमित्ताने मी सांगू इच्छितो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, बीडीडी चाळींची पुनरबांधणी करीत असतांना सामान्य माणसाला 300 ते 400 चौ.फूटांची घरे आपल्याला द्यावी लागणार आहेत. माझा माननीय मुख्यमंत्री महोदयांना प्रश्न आहे की, इंदू मिलचा टीडीआर शहरामध्ये देण्याचे आपण मान्य केलेले असल्यामुळे मी या निर्णयाचे स्वागत करीत असतांना 93 एकरांवर तो टीडीआर विकत घेऊन त्या ठिकाणी गिरणी कामगारांना आणखी 20 हजार घरे उपलब्ध करुन दिली जाणार आहेत काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारलेला असल्यामुळे उत्तर देण्याची आवश्यकता नाही.

श्री. राम पंडागळे: सभापती महोदय, ...

सभापती : हा प्रश्न अत्यंत महत्वाचा असल्यामुळे मी या प्रश्नासाठी 10 मिनिटांचा वेळ वाढवून दिला होता. सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांना विनंती आहे की, या प्रश्नाच्या संदर्भात आपण सन्माननीय राज्यमंत्र्यांना भेटावे. या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी तसेच

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

सन्माननीय राज्य मंत्र्यांनीही सविस्तर उत्तर दिलेले आहे. या प्रश्नाच्या संदर्भात मी माननीय राज्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, संबंधित आमदारांना आपल्या दालनात बोलावून सविस्तर चर्चा करावी व मार्ग काढावा.

आता प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचनांसंबंधी

सभापती :माझ्याकडे नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या तीन सूचना आलेल्या असून पहिली 289 ची सूचना सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर,रामदास कदम, श्रीमती शोभाताई फडणवीस, डॉ. दीपक सावंत, श्री. रामनाथ मोते, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. चंद्रकांत पाटील, ॲड.अनिल परब, श्री. विजय गिरकर, श्री. विनायक राऊत, डॉ.रणजित पाटील, श्री.गोपीकिशन बाजोरिया, ॲड.आशिष शेलार, श्री. प्रवीण पोटे, वि.प.स. यांनी दिली असून या सूचनेमध्ये असे म्हटले आहे की, "दिनांक 19 मार्च, 2012 रोजी मा.राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करतांना विरोधी पक्षाच्या विविध नेत्यांनी प्रत्यक्ष सिंचनाखाली आलेल्या जमिनीची आकडेवारी चुकीची असल्याचे सभागृहात नमूद करणे", पाणी साठविण्यासाठीचा खर्च 1 कोटी 56 लक्ष असतांना तो सन 2010-2011 मध्ये 7 कोटी 11 लक्षापर्यंत पोहोचल्याचे नमूद करुन या भ्रष्टाचाराची निवृत्त न्यायाधीशांर्मात चौकशी करण्याची मागणी त्यांनी केलेली आहे.

तसेच दुसरी नियम 289 प्रस्तावाची सूचना सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते, श्री. विनोद तावडे, श्री. भगवान साळुंखे, श्री. नागो पुंडलिक गाणार, वि.प.स.यांनी दिली असून त्या सूचनेमध्ये असे म्हटले आहे की, "दिनांक 2 मे, 2012 रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील शासनमान्य अनुदानित संस्थांमधील शिक्षक शिक्षकेतरांच्या भरतीवर बंदी घालणे, भविष्यात मान्यता काढून घेण्यात येणाऱ्या शाळा आजही सुरु असणे, शैक्षणिक वर्ष 2012-2013 अखेर नियमानुसार या शाळा बंद होण्याची शक्यता नसणे, राज्यात अनुदानित संस्थांमध्ये शिक्षक-शिक्षकेत्तरांची हजारो पदे रिक्त असणे, बंदी घातल्यामुळे शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे.

तिसरा नियम 289 च्या प्रस्तावाची सूचना श्री. जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिली असून त्या सूचनेमध्ये असे म्हटले आहे की, "सिंचन घोटाळयातील ज्या अधिकाऱ्यांविरुध्द चौकशी सुरु आहे त्यांच्यावर कोणतीही कारवाई न होणे, सिंचन प्रकल्पामुळे अंदाजपत्रकात दुपटीने-तिपटीने वाढ करणे, सिंचनाच्या श्वेतपत्रिकेतील आकडेवारी फसवी असणे, त्यामुळे सिंचन घोटाळयाची नि:पक्षपातीपणे चौकशी एस.आय.टी. मार्फत करणे".

यानंतर श्री. ओटवणेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

सिंचनाच्या संदर्भात कालही दोन प्रस्तावाच्या सूचना आल्या होत्या. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांची प्रस्तावाची सूचना आजच आली आहे. मी सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांची प्रस्तावाची सूचना प्रलंबित ठेवतो. शेवटच्या आवठड्यामध्ये वेळ देता आली तर ती देण्याचा प्रयत्न करतो. त्यासाठी त्यांनी मला येऊन भेटावे. त्यांच्या प्रस्तावासाठी वेळ कशी देता येईल हे मी पाहीन.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि विद्यमान केंद्रीय मंत्री श्री.शरदश्चंद्र पवार यांचा आज दिनांक 12/12/12 रोजी वाढदिवस आहे. मी सदनाला विनंती करतो की, त्यांच्या वाढदिवसानिमित्त सगळ्यांनी मिळून अभिष्टचिंतन करू या.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी मांडलेला प्रस्ताव सभागृहाचा आहे असे समजून माननीय नामदार श्री.शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त हे सभागृह त्यांचे अभिष्टचिंतन करीत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आज माननीय श्री.गोपीनाथ मुंडे साहेबांचा देखील वाढदिवस आहे. तेव्हा दोन्ही नेत्यांचे अभिष्टचिंतन करावे अशी माझी विनंती आहे.

सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी माननीय श्री.गोपनाथ मुंडे साहेबांचा वाढदिवस असल्याचे निदर्शनास आणले आहे. तेव्हा आपण श्री.गोपीनाथ मुंडे यांचे देखील अभिष्टचिंतन करू या.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचनां संबंधी

सभापती : आज ज्या नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचना देण्यात आल्या आहेत त्या काल देखील देण्यात आल्या होत्या. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे आणि इतर सन्माननीय सदस्यांची पहिला प्रस्तावाची सूचना होती, तर दुसरी प्रस्तावाची सूचना सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांची होती. काल जी मागणी होती तीच आजच्या सूचनेमध्ये देखील आहे. यासंबंधी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, सन्माननीय विरोधी पक्ष नेते, गट नेते श्री.दिवाकरजी रावते, यांची तासाभरा पूर्वी बैठक झाली होती. तेव्हा यासंबंधी मी आज कोणताही निर्णय घेणार नाही. मी या दोन्ही प्रस्तावाच्या सूचना प्रलंबित ठेवतो. याबाबत मी मघाशी विरोधी पक्षासह शासनाशी देखील चर्चा केलेली आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, कालही आम्ही आपल्या मार्फत सरकारकडे म्हणणे मांडले होते. आपण गेल्या चार-पाच अधिवेशनात पाहिले आहे की, हा विषय आम्ही माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या चर्चेच्या वेळी देखील उपस्थित केला होता. आम्ही जे मुद्दे मांडले त्यावर शासनाकडून काहीच उत्तर आले नाही. आम्ही बजेट अधिवेशनामध्ये हा विषय उपस्थित केला होता. त्यावेळी देखील हा विषय सोडून अन्य मुद्यांवर उत्तर देण्यात आले. अंतिम आठवडा प्रस्तावामध्ये देखील आम्ही हा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी देखील उत्तर देण्यात आले नाही. आम्ही ज्या ज्या वेळी हा मुद्दा उपस्थित केला होता त्या त्यावेळी उत्तर दिले असते तर हा विषय आम्ही पुन्हा येथे मांडला नसता. आम्ही सर्व संसदीय आयुधे वापरून सुद्धा आम्हाला उत्तर मिळालेले नाही. त्यामुळे या सिंचन घोटाळ्याची आपण चौकशी करावी.

माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी राजीनामा दिल्यानंतर म्हटले होते की, दूध का दूध और पानी का पानी होऊ दे. लाथ मारीन तेथे पाणी काढेन. प्रथम आपण एसआयटी मार्फत चौकशी तर करा. बाकीचे नंतर बघू. मी इमेज पेक्षा फाईल क्लिअर करण्यासाठी काम करतो, असे त्यांनी म्हटले होते. ते कोणाला म्हटले होते ते आम्हाला माहीत नाही. माझे म्हणणे एवढेच आहे की, इमेज न जपता मी पेंडींग काही ठेवत नाही असे म्हणता तर मग आमची एसआयटी ची मागणी मान्य का करत नाही, ती पेंडींग का ठेवता? मला आपल्या मार्फत शासनाला विनंती करायची आहे की, महाराष्ट्रामध्ये सिंचना संबंधी जे वातावरण निर्माण झालेले आहे. ते मोकळे करायचे असेल, त्यात काहीच गडबड नाही असे आपल्याला वाटत असेल, दूध का दूध पानी का पानी करायचे असेल तर ते काम श्वेतपत्रिकेद्वारे होणार नाही. ते एसआयटी च्या मार्फत होणार आहे. तेव्हा सिंचन घोटाळ्याची एसआयटी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

मार्फत चौकशी होऊ द्यावी. त्या चौकशीतून खरे काय ते बाहेर येईल. दूध का दूध पानी का पानी करण्याची आपली हिंमत आहे, तर मग तशी हिंमत एसआयटी द्वारा चौकशी करण्यासाठी देखील दाखवावी. त्यासाठी आपण घाबरता कशाला ? तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांनी एसआयटी मार्फत चौकशी करण्याची आमची विनंती मान्य करावी.

(सत्ताधारी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न देतात.)

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : या प्रश्ना संदर्भात माझ्या दालनात माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय संसदीय कामकाज मंत्री, माननीय विरोधी पक्ष नेते व माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्या बरोबर चर्चा झाली. परंतु त्यावर काही निर्णय झालेला नाही. काल देखील माझ्या दालनात आपण यावर चर्चा केली आणि या सभागृहात सुध्दा चर्चा केलेली आहे. तेव्हा मी या संदर्भातील निर्णय प्रलंबित ठेवलेला आहे. या बाबत कोणतीही चर्चा होऊ नये असे माझे मत आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी जागेवर उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत करतात.)

कामकाजपत्रिकेतील इतर कामकाज पूर्ण करावे असे आपले ठरले आहे. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे या संदर्भातील निर्णय प्रलंबित ठेवलेला आहे, मी काहीही निर्णय घेतलेला नाही.... (गोंधळ)... मी माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांना सांगू इच्छितो की, या संदर्भात माझ या दालनात दोन वेळा चर्चा झालेली आहे. माननीय उप मुख्यमंत्री, माननीय विरोधी पक्ष नेते तसेच माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते व अन्य सदस्य यांच्या बरोबर चर्चा केली होती. या चर्चेमध्ये माननीय मुख्यमंत्री महोदयांना बोलावणे आवश्यक आहे असे मला वाटले म्हणून मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना बोलावले. त्यानंतर आपण सर्वांनी जवळपास 20 ते 25 मिनिटे चर्चा केली. ही चर्चा करीत असताना असे ठरले की, आजच्या कामकाजपत्रिकेतील प्रश्नोत्तरे, विधेयके आणि इतर कामकाज पूर्ण करावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ...

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना मी सांगू इच्छितो की किमान मी बोलत असताना तरी आपण बोलू नये. माझ्या दालनात जी चर्चा झाली ती मी सांगत आहे. प्रश्नोत्तरे व विधेयके घ्यावी फक्त लक्षवेधी सूचना घेऊ नयेत अशी माझ्यासमोर चर्चा झाली आणि आपण दोघांनीही ती मान्य केली होती. तेव्हा चर्चा झाल्याप्रमाणे कामकाज करणे आवश्यक आहे. मी पुन्हा एकदा सांगतो की, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेवरील निर्णय मी प्रलंबित ठेवलेला आहे. मी ती सूचना नाकारलेली नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपल्या दालनात चर्चा झाली त्यावेळी माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय संसदीय कामकाज मंत्री, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील आणि मी उपस्थित होतो.त्यावेळी आम्ही स्पष्ट सांगितले होते की, आमची एस.आय.टी.ची मागणी मान्य केल्यानंतर आम्ही चर्चेला येऊ. तेव्हा संसदीय कामकाम मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील म्हणाले की, विधेयके महत्वाची आहेत. त्यावेळी आम्ही सांगितले की, आमची एस.आय.टी.ची मागणी मान्य केल्यानंतर आम्ही विधेयके मंजूर करुन देऊ. आमची विनंती आहे की, महाराष्ट्रातील भ्रष्टाचाराचे काळे ढग हे एस.आय.टी. लागू केल्यानंतरच दूर होऊ शकतील. जोपर्यंत एस.आय.टी.लागू करण्याचा निर्णय होत नाही तोपर्यंत हा प्रस्ताव प्रलंबित ठेवावा. निर्णय झाल्यानंतर आम्ही कामकाज चालविण्यास तयार आहोत.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मुद्दा उपस्थित केला. सर्वसाधारण असा संकेत आहे की, आपल्या दालनात झालेल्या चर्चेचा येथे उल्लेख केला जात नाही. आपण या संदर्भात निर्णय दिलेला आहे की, या संदर्भातील निर्णय राखून ठेवलेला आहे, मी तो नंतर देईन. आपण निर्णय दिल्यानंतर पुन्हा सभागृहात चर्चा होणे बरोबर नाही. आजच्या कामकाजपत्रिकेत दर्शविलेली विधेयके महत्वाची आहेत तसेच इतर कामकाज देखील महत्वाचे आहे. तेव्हा आपण पुढील कामकाज सुरु करावे अशी विनंती आहे.

यानंतर श्री.सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(गोंधळ)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, एसआयटीसंदर्भात अगोदर चर्चा झाली पाहिजे...

सभापती : आता तारांकित प्रश्नांची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

(गोंधळ)

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य "वेल" मध्ये येऊन घोषणा देतात.)

श्री. अनिल देशमुख (अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात धान्यकोटा वाटपात झालेला भ्रष्टाचार" या विषयावरील सर्वश्री. विनायकराव मेटे, हेमंत टकले, रमेश शेंडगे, वि.प.स. श्रीमती उषाताई दराडे, माजी वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक 25740 ला दिनांक 28 मार्च, 2012 रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : अधिक माहिती छापावी.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: लक्षवेधी सूचनांसबंधी

(गोंधळ)

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य "वेल" मध्ये येऊन घोषणा देतात.)

सभापती : आजच्या कार्यक्रम पत्रिकेतील बाब क्रमांक तीनवरील सर्व लक्षवेधी सूचना नंतर चर्चेला घेण्यात येतील.

II 3/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(गोंधळ)

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य "वेल" मध्ये घोषणा देतात.)

शासकीय विधेयके

पृ.शी.: स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) विधेयक

मु.शी.: सन 2012 चे वि.प.वि. क्रमांक 7 महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) विधेयक यावरील दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.

श्री. राजेंद्र दर्डा (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सन 2012 चे वि.प.वि. क्रमांक 7 महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) विधेयक, 2012 यावरील दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीचे प्रतिवृत्त मी आपल्या अनुमतीने सादर करतो.

सभापती महोदय, या संदर्भात मला जे निवेदन करावयाचे होते ते लेखी स्वरुपात मी आपणास सादर करतो.

सभापती : सन 2012 चे वि.प.वि. क्रमांक 7 महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) विधेयक, 2012 यावरील दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीचे प्रतिवृत्त सभागृहास सादर झाले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(गोंधळ)

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य "वेल" मध्ये घोषणा देतात.)

पृ.शी.: राज्य निवडणूक आयुक्त (अर्हता व नियुक्ती) (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO. LI OF 2011

(A BILL FURTHER TO AMEND THE STATE ELECTION COMMISSIONER (QUALIFICATIONS AND APPOINTMENT) ACT, 1994.)

प्रा. (श्रीमती) फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 51 राज्य निवडणूक आयुक्त (अर्हता व नियुक्ती) अधिनियम, 1994 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडते.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

प्रा. (श्रीमती) फौजिया खान : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2011 चे वि.स.वि. क्रमांक 51 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडते.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : सन 2011 चे वि.स.वि. क्रमांक 15 संमत झाले आहे.

(गोंधळ)

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य "वेल" मध्ये घोषणा देतात.)

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: महानगरपालिका व नगरपरिषदा

(तिसरी सुधारणा) विधेयक

L.C. BILL NO. XIV OF 2012.

(A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT AND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965 AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO JOINT SELECT COMMITTEE.)

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.प.वि.क्र. 14 - मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक सनगरी अधिनियम, 1965 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

सभापती : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा पहिला प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी दिलेला आहे. तो त्यांनी मांडावा.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, राज्यातील सिंचनाच्या बाबतीत देखील एस.आय.टी. मार्फत चौकशी झाली पाहिजे. जर आपण ही चौकशी मान्य करणार असाल तर मी या विधेयकाच्या संबंधात भाषण करण्यास तयार आहे.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही.)

सभापती : यानंतर विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी दिलेला आहे. त्यांनी तो मांडावा.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

सभापती : यानंतर विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा तिसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.विनायक राऊत यांनी दिलेला आहे. त्यांनी तो मांडावा.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 7 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1,संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.प.वि.क्रमांक - 14 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

सभापती : अशा परिस्थितीमध्ये कामकाज चालविणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक 2.23 ते 2.33 पर्यंत तहकूब करण्यात आली.)

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

सभापती : सन 2012 चे वि. प. वि. क्रमांक 14 संमत करण्याबाबतचा प्रस्ताव माननीय मंत्री महोदयांनी पुन्हा मांडावा.

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.प.वि. क्रमांक 14.....

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आम्हाला पुन्हा आपल्याला विनंती करावयाची आहे आपण निर्णय प्रलंबित ठेवणार आहात. या संदर्भात आमची राज्यातील 11 कोटी जनतेच्या वतीने अशी प्रामाणिक भूमिका आहे की, हे मळभ दूर झाले पाहिजे म्हणून आम्ही एसआयटीची मागणी करीत आहोत. आम्हाला सभागृहाचे कामकाज बंद पाडण्यामध्ये किंवा गोंधळ करण्यामध्ये अजिबात रस नाही. आम्हाला चर्चा हवी आहे. त्यामुळे एसआयटी जर लागू झाली तर सर्व चर्चा होईल. शासनाने एसआयटी लागू करावी, आम्ही सर्व चर्चेला तयार आहोत. त्यामुळे मला आपल्याला विनंती करावयाची आहे की, आपण आम्हाला संरक्षण द्यावे.

सभापती : मी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, आपण काल आणि आज नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या दोन्ही सूचना मी तहकूब ठेवलेल्या आहेत. त्या सूचना मी नाकारलेल्या नाहीत किंवा त्या बाबतीत निर्णय घेतलेला नाही. म्हणून माझी अशी इच्छा आहे की, आता जे विधेयक अपूर्ण आहे ते पूर्ण करु या.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य माननीय सभापतींच्या आसनाजवळील वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.प.वि. क्रमांक 14 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : सन 2012चे वि.प.वि. क्रमांक 14 संमत झाले आहे.

सभा□हापुढील □म□ज संपलेले असून सभा□हाची बैठ□ आता स्था□त होत आहे. उद्या गुरुवार, दि□ी□ 13.12.2012 रोजी स□ळी 10.30 ते 11.45 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक भरेल. त्या बैठकीत इंदू मिलच्या जागेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारण्याबाबतच्या नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु होईल.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

(सभा□हाची बैठ□ दुपारी 2 वाजू□36 मि□टां□, गुरुवार, दि□ी□ 13.12.2012 रोजीच्या स□ळी 10.30 वाजेपर्य□त स्था□त झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही